

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २९३ * नांदेड * मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

नांदेड जिल्हा न्यायालयाला बॉम्बची धमकी; न्यायालय तातडीने रिकामे

प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या आदेशानंतर सर्वांची धावपळ; बॉम्बशोधक पथकाकडून कसून तपासणी, तीन तासानंतर न्यायालय परिसर खुला



नांदेड (प्रतिनिधी)– येथील जिल्हा न्यायालयाला सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास बॉम्ब ठेवल्याबाबत धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्याने न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली. पोलिसांनी तब्बल तीन तास कसून चौकशी केल्यानंतर न्यायालय परिसर पुन्हा खुला करण्यात आला.

ईमेलचा संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे यांनी तातडीने न्यायालयातील विविध इमारती आणि अभिवक्ता संघाचे बार रूम रिकामे करण्याचे आदेश दिले. त्यानंतर काही वेळातच संपूर्ण न्यायालय परिसरातील कामकाज थांबवून इमारती रिकाम्या करण्यात आल्या. खबरदारीचा उपाय म्हणून सर्व न्यायाधीशांना घरी परतण्याच्या सूचना देण्यात आल्या, तर सोमवारी सुनावणीसाठी असलेल्या प्रकरणांच्या तारखा पुढे ढकलण्यात आल्या.

धमकीचा ई-मेल प्राप्त होताच न्यायालयीन पोलिसांनी ध्वनिक्षेपकावरून वकील बांधव, पक्षकार आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांना परिसर रिकामा करण्याचे आवाहन केले. जिल्हा न्यायालयाची मुख्य इमारत, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर इमारत, मुख्य न्यायाधीश न्यायिक इमारत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची (डीएलएसए) इमारत तसेच अभिवक्ता संघाचे बार रूम तातडीने रिकामे करण्यात आले.

दरम्यान, संपूर्ण न्यायालय परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला. मुख्य प्रवेशद्वार आणि मागील प्रवेशद्वार बंद करण्यात आले असून, परिसरात येणाऱ्या-जाणाऱ्यांवर निर्बंध घालण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, पोलीस निरीक्षक रंजीत भोईटे, अजित कुंभार तसेच वाहतूक शाखेचे मारुती मुंडे यांच्यासह पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचा ताबा घेतला. बॉम्ब शोधक व नाशक पथक, एटीएस, फॉरेन्सिक **(पान २ वर...)**

राज्यातील अनेक जिल्हा न्यायालयांनाही ई-मेल

राज्यभरातील विविध जिल्ह्यातील जिल्हा न्यायालय उडवून देण्याचा ई-मेल आल्याने सर्वत्र खळबळ उडाली असून पोलीस यंत्रणांनी सर्वच न्यायालयांचा परिसर रिकामा केल्याचं दिसून आलं. ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोलीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील न्यायालयाला असा धमकीचा ई-मेल आल्याची माहिती असून सर्वच ठिकाणी पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून अधिक तपास सुरू आहे. सायबर पोलिसांकडूनही ई-मेल पाठवणाऱ्या आरोपीचा शोध घेतला जात आहे.

अभिवक्ता संघाकडून सदस्यांना सतर्कतेचे आवाहन

नांदेड जिल्हा न्यायालयाला धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर अभिवक्ता संघ, नांदेडच्या वतीने सर्व सदस्यांना महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली. प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे यांच्या २ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार न्यायालयीन परिसरातील सर्व इमारती आणि अभिवक्ता संघाचे बार रूम तातडीने रिकामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर कोणत्याही सदस्याने घाबरून जाऊ नये, अफवा किंवा गैरसमज पसरवू नयेत, न्यायालयीन प्रशासनाच्या निर्देशांचे पालन करावे आणि पोलीस व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कुणबी नोंदी शोधणे बंद करू नका, अन्यथा गाठ आमच्याशी आहे

मनोज जरांगे पाटलांचा सरकारला इशारा





नांदेड (प्रतिनिधी)– मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, आमच्या नोंदी शोधण्याचे काम बंद करू नका. प्रमाणपत्र दिले तर तुमचे आणि आमचे संबंध चांगले राहतील, नाहीतर तुमची गाठ आमच्याशी आहे, असा सज्जड इशारा मराठा आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला. नांदेड येथील मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांचे वडील स्वर्गीय गणपतराव वडजे यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुचिता श्याम पाटील वडजे यांनी केले, तर श्याम पाटील वडजे यांनी आपल्या वडिलांच्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी आपल्यावरील ५०० कोटी रुपयांच्या आरोपावर जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, मला ५०० कोटी रुपये दिले म्हणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मी ५०० कोटी रुपये घेऊन ठेवू तरी कुठे? मला आणि माझ्या बायकोला ते मोजायला किती दिवस लागतील? मला बदनाम करण्याचा प्रयत्न करू नका. मी करत असलेले मराठा आरक्षणाचे आंदोलन बंद पाडण्यासाठी हे षडयंत्र रचले जात आहे, हे सर्वांना दिसत आहे. पण मी कुठल्याही आमिषाला बळी पडलो नाही आणि पडणारही नाही. मी मराठा समाजाचा घात कधीच करणार **(पान २ वर...)**

माळकौठा येथे मयत शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या कुटूंबियांची भेट

फायनान्सच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केलेले मुदखेड तालुक्यातील माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या कुटूंबियांची मनोज जरांगे पाटील यांनी भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी फायनान्स कंपन्यांच्या जाचावरही भाष्य करत शेतकऱ्यांना आत्महत्या न करण्याचे आवाहन केले. एवढेच नाही तर त्यांनी फायनान्सचे कर्ज परत देऊ नये असे आवाहनही त्यांनी केले.

'किमान नकली संसदेत तरी पंतप्रधान व्हा', अमित शाहांचा राहुल गांधींना टोला

हैदराबाद (प्रतिनिधी)– राहुल गांधी फक्त अशा नकली संसदेतच देशाचे पंतप्रधान बनू शकतात, खऱ्या संसदेत ते कधीही पंतप्रधान होऊ शकणार नाहीत, त्यामुळे कमीत कमी मॉक पार्लमेंटरीमध्ये पंतप्रधान बनून सोनिया गांधी यांच्या मनाला शांती मिळू द्या, अशा शब्दात अमित शाहांनी टीका केली.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हैदराबाद येथे भाजपच्या 'लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ' पदयात्रेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. काँग्रेसने आयोजित केलेल्या मॉक पार्लमेंटरीवरून अमित शाह यांनी टीका केली.

यासोबतच, एसआयआर प्रकरणावरून देशव्यापी अराजकता पसरवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा करत शाह यांनी राहुल गांधी यांना संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचे खुले आव्हान दिले.

गर्भवती पत्नीचा खून केलेल्या पतीची पोलीस ठाण्यातच आत्महत्या

ग्रामीण पोलीस ठाण्यातील धक्कादायक प्रकार

नांदेड (प्रतिनिधी)– तालुक्यातील धनेगाव येथील वीटभट्टीवर मुदखेड येथील एका मजुराने आपल्या ४ महिन्यांच्या गर्भवती पत्नीचा गळा दाबून खून केला. यानंतर नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यातच त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास उघडकीस आली आहे. घटना घडल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली.

मयत आरोपी सुशील महाजन हैबते (वय ३७, रा. मुदखेड) याने पत्नी छाया हैबते (वय ३०) हिचा चारित्र्याच्या संशयावरून गळा दाबून खून केला. मिळालेल्या माहितीनुसार, सुशील आणि छाया यांच्यात चारित्र्याच्या संशयावरून मागील काही महिन्यांपासून वाद सुरू होता. २ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजताच्या सुमारास सुशीलने छायाचा गळा दाबून खून केला आणि पसार झाला होता. नातेवाईक घरी गेल्यावर सदरची घटना उघडकीस आली.

या प्रकरणात नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात सुशील हैबते याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेची माहिती मिळाल्यानंतर नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी या प्रकरणाचा तपास वेगाने फिरवत तात्काळ कारवाई करत सुशीलला सकाळी ताब्यात घेऊन ठाण्यात आणले. पोलिसांची नजर चुकवत आरोपी सुशील याने शौचालयाच्या खिडकीला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. ईनक्वेस्ट पंचनामा झाल्यानंतर मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला.

तपास पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले करत आहेत. या प्रकरणात आरोपीने पोलीस ठाण्यात आत्महत्या करणे ही बाब गंभीर असून चौकशीअंती संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी सांगितले. सध्यातरी या प्रकरणात नांदेड ग्रामीण ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी खासगी डॉक्टरांनी शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत सहकार्य करावे -आरोग्यमंत्री आबिटकर

- आरोग्य जनसंवाद यात्रेनिमित्त नांदेडमधील खासगी डॉक्टरांशी आरोग्यमंत्र्यांचा संवाद
- डॉक्टरांच्या अडचणी व सूचनांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन

नांदेड (प्रतिनिधी)– राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मोफत किंवा कमीत कमी दरात उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी खासगी रुग्णालये व वैद्यकीय संघटनांनी शासनाला सहकार्य करावे. डॉक्टरांनी मांडलेल्या अडचणी व सूचनांचा सकारात्मक विचार करून आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.



राज्य शासनाच्या वतीने दि. १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'आरोग्य जनसंवाद यात्रे'चा प्रारंभ नांदेड जिल्ह्यातून करण्यात आला. या यात्रेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित बैठकीत आरोग्यमंत्री आबिटकर यांनी जिल्ह्यातील खासगी डॉक्टरांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा **(पान २ वर...)**

स्थानिक पातळीवर मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून देण्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे निर्देश

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, रब्बी हंगामातील कमी पेरणी आणि शेतीतील रोजगाराच्या मर्यादित संधी लक्षात घेता ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजुरांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत. ग्रामीण भागातील मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजना तसेच विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.



या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच कृषी, सामाजिक वनीकरण, वन विभाग आणि जलसंधारण विभागाच्या प्रमुखांना अर्धशासकीय पत्राद्वारे विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये दर १५ दिवसांनी रोजगार मागणी शिबिर आयोजित करून मजुरांच्या कामाच्या मागणीची नोंद करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक तालुक्यात आठवडी बाजाराच्या दिवशी तालुकास्तरीय रोजगार मागणी शिबिर आयोजित करून महिन्यात किमान दोन शिबिरे घेण्यात येणार आहेत.

प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान १०० मजुरांना रोजगार उपलब्ध करून देता येईल, एवढ्या मनुष्यदिनांच्या कामांचा कृती आराखडा तयार करून कामे उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान १०० जलतारा कामे हाती घेण्यासह पुनर्भरण न झालेल्या वैयक्तिक विहिरींच्या पुनर्भरणाची कामे प्राधान्याने करण्यास सांगण्यात आले आहे. या माध्यमातून रोजगार निर्मितीसोबतच जलसंधारण आणि भूजल पातळी वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

शेतातील पीक अवशेष व कुटार जाळून न टाकता त्यावर योग्य प्रक्रिया करून सकस पशुखाद्य तयार करण्याबाबत मजुरांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. रोजगार मागणी शिबिरांमध्ये यासंदर्भात प्रात्यक्षिके आयोजित करण्यासह हायड्रोपोनिक चारा लागवडीबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन रोजगार हमी अभियानांतर्गत चारा लागवडीची कामेही हाती घेण्यात येणार आहेत.

ग्रामीण भागातील ज्या मजुरांना रोजगाराची आवश्यकता आहे, त्यांनी आपल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधून ग्रामरोजगार सहाय्यक अथवा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे रोजगार हमी योजनेंतर्गत कामाची मागणी नोंदवावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांची बदली

संदीप जाधव यांची नियुक्ती





नांदेड (प्रतिनिधी)– अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांची बदली झाली आहे. नांदेडहून सातारा येथे त्यांची याच पदावर बदली करण्यात आली आहे.

गुरव यांच्या जागी बदलीच्या प्रतिक्षाधीन असलेले संदीप जाधव यांची नांदेडच्या अपर पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आलरी आहे. गृहविभागाने दि. २ नोव्हेंबर रोजी अपर पोलीस अधीक्षक/पोलीस अधीक्षक दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत. यात २२ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

पुणे, बारामती, इंदापुरात अवकाळी पावसाचा हाहाकार

पुणे (प्रतिनिधी)– राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना पुणे जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पुणे शहरासह बारामती, इंदापूर आणि जिल्ह्यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला असला, तरी अचानक आलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. विशेषतः बारामतीमध्ये अवघ्या काही तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. एका रात्रीत महिनाभराचा पाऊस पडल्याने शहरातील रस्त्यांना अक्षरशः नदीचे स्वरूप आले आहे. परिस्थिती लक्षात घेता बारामती नगरपालिकेच्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

बारामती शहराला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. २ नोव्हेंबर रोजी पहाटेपासून सुरू झालेल्या पावसाचा जोर पुढील काही तास कायम होता. अवघ्या अडीच ते तीन तासांच्या मुसळधार पावसाने शहरातील अनेक भाग जलमय झाले. सकाळी सात वाजेपर्यंत शहरात तब्बल १५८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अवघ्या काही तासांत इतका मोठा पाऊस झाल्याने शहरातील रस्त्यांवर पाणी साचले. अनेक रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते.

कासारखेडा येथे गुप्तधन काढण्याचा अघोरी प्रकार उधळला

गुप्तधन काढणाऱ्या १२ जणांवर जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा

अर्धापूर (प्रतिनिधी)– अर्धापूर पोलीस ठाणे हद्दीतील कासारखेडा येथे गुप्तधन काढण्यासाठी रात्रीच्या वेळी खोदकाम करणाऱ्या टोळीला पोलिसांनी जेरबंद केले आहे. या प्रकरणी मौलवींसह १२ जणांवर महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, कार आणि स्कुटरसह सुमारे ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास कासारखेडा येथील शेख अन्सार शेख सत्तार यांच्या घरामागील मोकळ्या जागेत गुप्तधन काढण्यासाठी खोदकाम सुरू असल्याची माहिती गस्ती पथकाला खबऱ्यामार्फत मिळाली. पोलीस घटनास्थळी येत असल्याची कुणकुण लागताच संशयित पळू लागले. त्यामुळे गावकऱ्यांनी चोर समजून त्यांना पकडून मारहाण केली. या मारहाणीत सेलू (जि. परभणी) येथील संजय बाबुराव जमदाडे, सर्जे राव नागराव वंजारे, शिवाजी शंकरराव राठोड यांच्यासह चौघे जखमी झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

चौकशीत असे समोर आले की, हासीम पठाण याने मजुरांना मजुरीच्या कामाच्या बहाण्याने कासारखेडा येथे आणले होते. तेथे दोन मौलवींनी धार्मिक विधी करून पाण्यावर फुंकर मारली आणि त्यानंतर मजुरांना खड्डा खोदण्यास सांगितले. घटनास्थळी सुमारे ७ बाय ६ फुटांचा खड्डा आढळला असून, तेथून फावडे, पहार, टिकास, टोपले व पाण्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत.


या प्रकरणी शेख अन्सार शेख सत्तार, सुफियान अन्सार शेख, मतीन अन्सार शेख, हासीम पठाण यांच्यासह छत्रपती संभाजीनगर व परभणी जिल्ह्यातील मौलवी व इतर अशा एकूण १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोउपनि सुरेश भोसले यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक अमोल भगत हे करीत आहेत. ही कारवाई सपोनि भाऊराव पावडे, सुभाष मुंगल, गजानन शिंदे, कांबळे, संजय घोरपडे, शहा, सोनटक्के यांच्या पथकाने केली.

राजस्थानमध्ये विजेच्या धक्क्याने कंत्राटदारासह ८ मजुरांचा मृत्यू

झुंझुनू (प्रतिनिधी)– राजस्थानमधील झुंझुनू जिल्ह्यातील छपोली गावात रस्त्याचे काम सुरु असतानाच आठ कामगारांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. या अपघातात इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडला.

उदयपूरवतीचे एसएचओ रामपाल म्हणाले यांनी या घटनेबाबत सांगितले की, ११ केव्हीची ही लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु अलीकडेच ती बदलण्यात आली. अपघातानंतर गावकरी आंदोलन करत आहेत. गावकरी रोहिताश्व म्हणाले, ११ केव्हीची लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु काही दिवसांपूर्वी ती रस्त्याच्या वरून हलवण्यात आली. सखल तारेमुळे हा मोठा अपघात घडला.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

हिमालयाच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?


हिमालय ही केवळ भौगोलिक सीमा नाही, तर दक्षिण आशियाच्या जीवनवाहिन्यांना पोसणारी नैसर्गिक व्यवस्था आहे. या पर्वतरांगांमधून उगम पावणाऱ्या नद्या भारत, नेपाळ, चीनसह अनेक देशांतील कोट्यवधी लोकांच्या पाणी, शेती आणि पर्यावरणीय गरजा भागवतात. त्यामुळे हिमालयातील हवामानबदलाचे संकट एका देशापुरते मर्यादित राहू शकत नाही. अलीकडील भूस्खलन, अतिवृष्टी, अचानक आलेले पूर आणि हिमनदीजन्य आपत्ती यांनी या वास्तवाची पुन्हा जाणीव करून दिली आहे. याच पार्श्वभूमीवर नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी भारत, चीन आणि नेपाळ यांच्या नेतृत्वाखाली 'हिमालयीन हवामान लवचिकता यंत्रणा' उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत मांडलेली ही संकल्पना केवळ पर्यावरणीय सहकार्यापुरती मर्यादित न ठेवता आपत्ती व्यवस्थापन, वैज्ञानिक माहितीची देवाणघेवाण आणि सीमापार पूर्वसूचना यंत्रणा मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. भोटेकोशी-त्रिशूली परिसरातील आपत्तीने सीमांना हवामानाच्या संकटासमोर किती मर्यादा आहेत, हे दाखवून दिले. पर्वतीय भागात निर्माण झालेला पूर एका देशाच्या हद्दीत थांबत नाही. नदीचा प्रवाह सीमा ओलांडतो आणि त्याबरोबर संकटही पुढे जाते. त्यामुळे आपत्तीचा सामना करताना राष्ट्रीय सीमा नव्हे, तर संपूर्ण नदीखोरे आणि हिमालयीन परिसंस्था हा नियोजनाचा आधार असला पाहिजे. प्रस्तावित यंत्रणेअंतर्गत उपग्रह माहिती, हवामानविषयक आकडेवारी आणि तांत्रिक कौशल्याची देवाणघेवाण करता येईल. हिमनद्यांमुळे निर्माण झालेल्या धोकादायक सरोवरांवर सतत देखरेख ठेवता येईल. अचानक येणाऱ्या पुरांची पूर्वसूचना देणाऱ्या यंत्रणा सीमापार जोडता येतील आणि आपत्तीच्या काळात तिन्ही देशांमध्ये समन्वयाने बचावकार्य राबवता येईल. या उपाययोजना कागदावर आकर्षक वाटत असल्या तरी त्यांची अंमलबजावणी ही खरी कसोटी असेल. भारत आणि चीन यांच्यातील सामरिक अविश्वास हा या सहकार्यापुढील मोठा अडथळा आहे. हिमालयीन सीमावाद, लष्करी तणाव आणि संवेदनशील उपग्रह किंवा जलविषयक माहितीच्या देवाणघेवाणीबाबतची सावध भूमिका यामुळे पर्यावरणीय सहकार्यालाही मर्यादा येतात. मात्र हवामानबदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींच्या बाबतीत पूर्ण सहकार्य करणे म्हणजे सामरिक हितसंबंधांचा त्याग करणे नव्हे. उलट, वैज्ञानिक माहिती आणि आपत्तीपूर्व इशारे सामायिक करण्यासाठी स्वतंत्र, पारदर्शक आणि विश्वासार्ह यंत्रणा उभारणे दोन्ही देशांच्या हिताचे आहे. हिंदुकुश-हिमालयीन प्रदेशाला 'आशियाचा जलकुंभ' म्हटले जाते. या प्रदेशावर सुमारे दोन अब्ज लोकांच्या जीवनाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आधार आहे. हिमनद्या वितळणे, अनियमित पाऊस, तापमानवाढ, भूस्खलन आणि अचानक येणारे पूर यांचा परिणाम भविष्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पर्यावरणीय सुरक्षेला राष्ट्रीय सुरक्षेइतकेच महत्त्व देण्याची वेळ आली आहे. नेपाळने स्वतःच्या पातळीवर हवामान अनुकूलनासाठी विविध उपाय केले आहेत. वनक्षेत्राचे संवर्धन आणि विस्तार करून कार्बन शोषणाची क्षमता वाढविण्याचा त्याचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. मात्र नेपाळसारख्या पर्वतीय देशाला हवामान संकटाचा सामना एकट्याने करणे शक्य नाही. भारत आणि चीन या दोन्ही मोठ्या शेजारी देशांनी त्याच्या प्रयत्नांना तांत्रिक आणि संस्थात्मक सहकार्य देणे आवश्यक आहे. भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' धोरणाचा आणि चीनच्या 'बेल्ट अँड रोड' उपक्रमाचा संदर्भ या सहकार्याला गुंतागुंतीचे राजनैतिक परिमाण देतो. तरीही पर्यावरणीय संकटाला राजकीय स्पर्धेच्या चौकटीत अडकवणे धोकादायक ठरेल. नदी, हिमनदी किंवा ढगांना सीमा माहीत नसतात; मग त्यांच्यापासून निर्माण होणाऱ्या धोक्यांना सामोरे जाताना सहकार्याला सीमा का असाव्यात? नेपाळचा प्रस्ताव त्यामुळे केवळ तीन देशांचा पर्यावरणीय करार म्हणून न पाहता व्यापक प्रादेशिक सहकार्याची सुरुवात म्हणून पाहायला हवा. भारत आणि चीनने परस्पर मतभेद कायम ठेवूनही हवामान, जलसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रात किमान समान कार्यक्षेत्र निश्चित करणे शक्य आहे. हिमालयाचे रक्षण ही कोणत्याही एका देशाची जबाबदारी नाही. तेथील पर्यावरणीय स्थैर्य अबाधित ठेवणे म्हणजे दक्षिण आशियातील कोट्यवधी लोकांच्या भवितव्याचे संरक्षण करणे होय. हवामानबदलाचा इशारा स्पष्ट आहे. आता प्रतिसाद देण्याची वेळ आहे. हिमालयाला संघर्षाची सीमा न बनवता सहकार्याचे केंद्र बनविणे, हेच भारत, चीन आणि नेपाळसमोरील आगामी काळातील मोठे आव्हान आणि तितकीच मोठी संधी आहे.

श्री चक्रपाणी महाराज अवतार दिन: समता, अहिंसा आणि सदाचाराचा चिकित्सक अन्वयार्थ

महाराष्ट्राच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात महानुभाव पंथाचे योगदान अनन्यसाधारण आहे. मराठी भाषेच्या आरंभीच्या गद्यपरंपरेला व पद्यपरंपरेला समृद्ध करणाऱ्या या पंथाने धार्मिक श्रद्धेबरोबरच आचारशुद्धी, वैराग्य, संयम आणि परमेश्वरनिष्ठा यांनाही महत्त्व दिले. या परंपरेतील पंचकृष्णांपैकी तृतीय अवतार द्वारावतीकार श्री चक्रपाणी महाराज, अर्थात श्रीचांगदेव राऊळ यांचा अवतार दिन हा केवळ धार्मिक उत्सवाचा प्रसंग नसून त्यांच्या चरित्राशी निगडित मूल्यांचे चिंतन करण्याची संधी आहे. त्यांच्या स्मरणातून समता, अहिंसा, मानवता आणि सदाचार यांसारख्या मानवी मूल्यांचा आजच्या समाजजीवनाशी असलेला संबंध समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते.

महानुभाव पंथाच्या श्रद्धापरंपरेनुसार श्रीकृष्ण चक्रवर्ती, श्रीदत्तात्रेय प्रभू महाराज, श्रीचक्रपाणी महाराज, श्रीगोविंदप्रभू महाराज आणि सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी हे पंचकृष्ण म्हणून ओळखले जातात. या पंचकृष्ण परंपरेतील तृतीय अवतार म्हणून श्री चक्रपाणी महाराज यांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण व वंदनीय मानले जाते 'श्रीचांगदेव राऊळ' आणि 'द्वारावतीकार' या नावांनीही त्यांचा उल्लेख केला जातो. पंचकृष्ण परंपरा ही महानुभाव पंथाच्या धार्मिक ओळखीचा आणि आध्यात्मिक ज्ञानाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. या परंपरेचे महत्त्व केवळ अवतारांच्या पूजनात नसून, त्यांच्याशी जोडलेल्या विचारांचा, आचारांचा आणि ज्ञानसंक्रमणाचा अभ्यास करण्यातही आहे.

माहूर आणि द्वारावती ही स्थाने केवळ भौगोलिक संदर्भापुरती मर्यादित नाहीत. धार्मिक परंपरेतील अशा स्थानांभोवती अवतारांनी सांगितलेल्या श्रुती, सामूहिक स्मृती, श्रद्धा आणि सांस्कृतिक ओळख विकसित होत असते. या स्थानांशी संबंधित आख्याने, चरित्रकथने आणि धार्मिक आचार यांच्या माध्यमातून समुदाय आपला वारसा जतन करतो. त्यामुळे श्री चक्रपाणी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करताना श्रद्धापरंपरेचे महत्त्व मान्य करण्याबरोबरच उपलब्ध ग्रंथ, पाठपरंपरा आणि ऐतिहासिक



संदर्भ यांचाही विचार करणे आवश्यक ठरते. श्रद्धेचा आदर आणि चिकित्सक दृष्टिकोन यांची सांगड घातल्यास धार्मिक इतिहासाचे अधिक समतोल आकलन होऊ शकते.

ज्ञानपरंपरेतील महत्त्वपूर्ण स्थान

श्री चक्रपाणी महाराजांचे महत्त्व महानुभाव पंथाच्या ज्ञानपरंपरेतील त्यांच्या स्थानामुळेही अधोरेखित होते. महानुभावीय परंपरेनुसार, त्यांनी श्रीगोविंदप्रभूंना अवतार परंपरेनुसार ज्ञानबोध दिला आणि पुढे श्रीगोविंदप्रभूंकडून सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींना अनुग्रह प्राप्त झाला. या ज्ञानपरंपरेमुळे श्री चक्रपाणी महाराजांचे स्थान पंथाच्या आध्यात्मिक इतिहासात महत्त्वपूर्ण ठरते. गुरू-शिष्य परंपरा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेची बाब नसते. तिच्या माध्यमातून विचारांचे सातत्य टिकते, आचारसंहितेचे जतन होते आणि पुढील पिढ्यांपर्यंत तत्त्वज्ञान पोहोचते. महानुभाव पंथाच्या संदर्भात या परंपरेचे स्मरण म्हणजे आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाच्या मुळांचा शोध घेणे होय.

महानुभाव पंथाचे योगदान धार्मिक क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. 'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिस्थळ' यांसारख्या ग्रंथांमधून महानुभावीय श्रद्धाव्यवस्था, चरित्रपरंपरा आणि तत्कालीन समाजजीवनाचे विविध पैलू समजून घेता येतात. मराठीतील आरंभीच्या गद्यपरंपरेच्या व पद्यपरंपरेच्या अभ्यासासाठीही हे साहित्य महत्त्वाचे आहे. प्रसंगनिवेदन, व्यक्तिचित्रण, भाषिक अभिव्यक्ती आणि धार्मिक अनुभवांचे कथन यांमधून तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप अभ्यासता येते.

समता आणि सामाजिक न्यायाची समकालीन गरज

महानुभाव पंथाच्या व्यापक विचारविश्वात परमेश्वरनिष्ठा, आचारशुद्धी, वैराग्य आणि जीवकल्याण (मानवता) यांना महत्त्वाचे स्थान आहे. या संकल्पनांचा आधुनिक समाजाच्या संदर्भात विचार केला, तर त्या समता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा यांसारख्या मूल्यांशी जोडता येतात. मात्र, ऐतिहासिक परंपरेतील शिकवण आणि तिचे आजच्या काळातील अर्थनिश्चिती यांत फरक ठेवणे आवश्यक आहे. आधुनिक सामाजिक प्रश्नांवर विचार करताना परंपरेचा विवेकनिष्ठ अन्वयार्थ लावणे, ही काळाची गरज आहे.

धार्मिक परंपरांतील नैतिक मूल्ये या दिशेने प्रेरणा देऊ शकतात. परंपरेचा अभिमान बाळगणे म्हणजे केवळ तिच्या गौरवशाली इतिहासाचे वर्णन करणे नव्हे, तर तिच्यातील मानवी मूल्ये वर्तमान जीवनात कितपत प्रतिबिंबित होतात, याचेही आत्मपरीक्षण करणे होय. समता आणि सामाजिक न्याय यांचा विचार प्रत्यक्ष आचरणाशी जोडला गेला, तरच परंपरेचे स्मरण समाजोपयोगी ठरू शकते.

अहिंसा, मानवता आणि सदाचाराचे महत्त्व

समाजातील शांतता आणि सहजीवनासाठी कायदे, संस्था आणि सार्वजनिक धोरणे आवश्यक असतात; परंतु समाजाचे नैतिक आरोग्य व्यक्तींच्या वर्तनावरही अवलंबून असते. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव, स्वतःच्या कृतीचे भान आणि अन्यायकारक वर्तनापासून दूर राहण्याची तयारी ही सुसंस्कृत समाजाची लक्षणे आहेत.

महानुभावीय आचारपरंपरेतील मानवता, संयम आणि आचारशुद्धी या मूल्यांचा समकालीन अर्थाने विचार केल्यास त्यांचा संबंध अहिंसक व्यवहार, प्राणिमात्रांविषयी संवेदनशीलता आणि सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा यांच्याशी जोडता येतो. अहिंसा म्हणजे केवळ शारीरिक हिंसा टाळणे नव्हे. अपमानास्पद भाषा, मानसिक छळ, सामाजिक बहिष्कार आणि दुर्बलांचे शोषण यांपासून दूर राहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, मतभिन्नतेतही संवाद टिकवणे आणि कोणत्याही व्यक्तीचा अवमान न करणे, ही अहिंसक सहजीवनाची आवश्यक तत्त्वे आहेत. मानवतेचा विचारही केवळ तात्त्विक चर्चेपुरता मर्यादित राहता कामा नये. तो दैनंदिन व्यवहारातील करुणा, जबाबदारी आणि संवेदनशीलतेतून व्यक्त झाला पाहिजे. त्याचप्रमाणे सदाचार म्हणजे केवळ वैयक्तिक धार्मिक नियमांचे पालन नव्हे, तर सत्यनिष्ठा, प्रामाणिक व्यवहार, कर्तव्यपालन आणि इतरांच्या अधिकारांचा आदर यांचाही त्यात समावेश होतो.

आधुनिक जीवनातील वैराग्याचा अर्थ

एकविसाव्या शतकात तंत्रज्ञान आणि माहितीच्या साधनांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. जीवन अधिक गतिमान झाले असले, तरी मानसिक अस्वस्थता, उपभोगवाद, सामाजिक ध्रुवीकरण आणि परस्परांतील अविश्वास ही आव्हाने कायम आहेत. या पार्श्वभूमीवर वैराग्य आणि सदाचार यांसारख्या संकल्पनांचा नव्याने विचार करणे आवश्यक आहे.

वैराग्याचा आधुनिक अर्थ भौतिक जीवनाचा संपूर्ण निषेध असा घेण्याऐवजी, उपभोगाच्या मर्यादा ओळखणे, अनावश्यक स्पर्धेपासून दूर राहणे आणि जीवनातील प्राधान्यक्रम विवेकाने ठरवणे असा करता येतो. संपत्ती, प्रतिष्ठा आणि बाह्य यश यांना जीवनाचे अंतिम ध्येय न मानता, त्यांचा वापर जबाबदारीने करणे हीदेखील वैराग्याच्या व्यापक अर्थाशी सुसंगत भूमिका ठरू शकते. त्याचप्रमाणे सदाचाराचा प्रत्यय केवळ वैयक्तिक जीवनातच नव्हे, तर सामाजिक आणि सार्वजनिक व्यवहारातही आला पाहिजे.

स्मरणातून आचरणाकडे

द्वारावतीकार श्री चक्रपाणी महाराजांचे चरित्र महानुभाव पंथाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत महत्त्वाचे स्थान राखते. पंचकृष्ण परंपरेतील त्यांचे स्थान, माहूरगडाशी संबंधित शक्तिस्वीकाराची पंथीय मान्यता, द्वारावतीशी जोडलेले अवतारकार्य आणि श्रीगोविंदप्रभूंच्या व श्री चक्रधर स्वामींच्या माध्यमातून पुढे प्रवाहित झालेली ज्ञानपरंपरा हे त्यांच्या चरित्राचे प्रमुख पैलू आहेत. या चरित्राचा अभ्यास श्रद्धेचा आदर राखून आणि चिकित्सक दृष्टिकोनातून केल्यास धार्मिक इतिहास, मराठी भाषेचा विकास आणि सामूहिक सांस्कृतिक स्मृती यांविषयीचे आकलन अधिक समृद्ध होऊ शकते.

श्री चक्रपाणी महाराजांच्या अवतार दिनानिमित्त त्यांना नमन करताना एक मूलभूत प्रश्न स्वतःला विचारणे आवश्यक आहे: आपण ज्या परंपरेचा अभिमान बाळगतो, तिच्यातील मूल्ये आपल्या जीवनात कितपत उतरवतो? समतेचा पुरस्कार करताना आपण भेदभावापासून दूर राहतो का? अहिंसेचा विचार करताना आपल्या शब्दांत आणि कृतींत संवेदनशीलता असते का? सदाचाराची शिकवण स्वीकारताना आपण वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा जपतो का?

द्वारावतीकार श्री चक्रपाणी महाराजांचा अवतार दिन हा म्हणूनच श्रद्धेचा उत्सव असण्याबरोबरच समता, अहिंसा, जीवदया (मानवता) आणि सदाचार यांचे पुनर्स्मरण करण्याचा दिवस आहे. परंपरेचा खरा गौरव तिच्या इतिहासाच्या अभिमानात जितका आहे, तितकाच तिच्यातील मानवी मूल्यांच्या आचरणातही आहे. श्रद्धेला विवेकाची जोड, विचारांना नैतिकतेची दिशा आणि स्मरणाला आचरणाची साथ मिळाली, तरच अवतार दिनाचा संदेश समताधिष्ठित, संवेदनशील आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीसाठी प्रेरणादायी ठरू शकतो.

–डॉ. गोपाळ मोहनराव कदम,
(चीफ रिसर्च सायंटिस्ट)
मु. पो. लिंबगाव (रे. स्टे.),
ता. जि. नांदेड

डिजिटल व्यवहारांची सुरक्षितता कोणाची जबाबदारी?

देशाची अर्थव्यवस्था डिजिटल करण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. त्याचे सकारात्मक परिणामही दिसू लागले आहेत. ऑनलाइन आर्थिक व्यवहारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, पैसे पाठवणे, वीजबिलांसह विविध बिलांचा भरणा करणे, ऑनलाइन खरेदी करणे आणि बँकिंग सेवा घेणे यांसारखी कामे आता घरबसल्या काही क्षणांत पूर्ण होत आहेत. इंटरनेट बँकिंग आणि डिजिटल पेमेंटमुळे आर्थिक व्यवहार अधिक वेगवान, सुलभ आणि सोयीस्कर झाले आहेत. मात्र, या सुविधांचा विस्तार होत असतानाच त्यातून निर्माण होणाऱ्या सायबर धोक्यांची व्याप्तीही वाढत आहे. ही बाब निश्चितच चिंताजनक आहे.

सायबर गुन्हेगार नवनवीन क्लृप्त्या लढवून नागरिकांच्या कष्टाच्या पैशांवर डल्ला मारत आहेत. विशेष म्हणजे, अनेकदा अशा फसवणुकीला वित्तीय संस्थांच्या सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि पडताळणीतील निष्काळजीपणाही कारणीभूत ठरतो. तरीही संबंधित बँका किंवा वित्तीय संस्थांची जबाबदारी निश्चित होताना दिसत नाही. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधताना सर्वोच्च न्यायालयाने गेल्या गुरुवारी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. वित्तीय संस्थांच्या योग्य तपासणी आणि पडताळणीतील निष्काळजीपणामुळे डिजिटल फसवणूक झाली असेल, तर



पीडितांना किमान गमावलेल्या रकमेइतकी नुकसानभरपाई मिळाली पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. हा निर्णय डिजिटल व्यवहारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणारा आहे.

डिजिटल फसवणुकीचे सर्वाधिक चिंताजनक वैशिष्ट्य म्हणजे सायबर गुन्हेगार नागरिकांच्या तांत्रिक अज्ञानाचा आणि विश्वासाचा पद्धतशीरपणे गैरफायदा घेत आहेत. कधी बँकेचे अधिकारी असल्याचे भासवून फोन केला जातो, तर कधी केवायसी अद्ययावत करण्याच्या नावाखाली माहिती मागितली जाते. वीजजोडणी खंडित होण्याची भीती दाखवणे, सरकारी योजनेचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवणे, बनावट लिंक पाठवणे किंवा खोट्या वेबसाइटच्या माध्यमातून वैयक्तिक माहिती मिळवणे, असे फसवणुकीचे अनेक प्रकार सुरू आहेत. काही प्रकरणांत तर तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना 'डिजिटल अटक' केल्याची भीती दाखवली जाते आणि त्यांच्याकडून लाखो रुपये उकळले जातात. अशा प्रकारांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकारांना 'डिजिटल दरोडा' असे संबोधत सायबर गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाईची आवश्यकता अधोरेखित केली आहे. विशेष म्हणजे, सायबर फसवणूक रोखण्यासाठी व्यापक जनजागृती केली जात असल्याचे सरकारी पातळीवर सांगितले जाते. तरीही सुशिक्षित नागरिक अशा फसवणुकीला बळी कसे पडतात, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे. हा प्रश्न केवळ नागरिकांच्या जागरूकतेपुरता मर्यादित नाही, तर सायबर सुरक्षेच्या उपाययोजना किती प्रभावी आहेत, याचीही तपासणी करण्याची गरज यातून अधोरेखित होते.

एकीकडे नागरिकांना डिजिटल पेमेंटचा अधिकाधिक वापर करण्यासाठी प्रोत्साहित करायचे आणि दुसरीकडे या व्यवहारांमधील तांत्रिक धोक्यांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी पुरेशी व्यवस्था उभी करायची नाही, ही विसंगती आहे. डिजिटल व्यवहारांचा वेग वाढवताना त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मात्र, व्यवस्थेच्या पातळीवर या धोक्यांचा मुकाबला करण्यासाठी अपेक्षित तत्परता दिसत नाही. सर्वसामान्य नागरिकांची डिजिटल साक्षरता वाढविण्याचे प्रयत्नही अधिक व्यापक आणि परिणामकारक होण्याची आवश्यकता आहे. बँका आणि अन्य वित्तीय संस्थांची जबाबदारी निश्चित करण्याबाबतही ठोस पावले उचलली जाणे गरजेचे आहे. अन्यथा, डिजिटल अर्थव्यवस्थेचा विस्तार हा नागरिकांच्या आर्थिक सुरक्षिततेच्या किंमतीवर होण्याचा धोका नाकारता येणार नाही.

याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रस्तावित नियामक आराखड्यात सायबर फसवणूक रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना, पीडितांना नुकसानभरपाई आणि वित्तीय संस्थांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत स्पष्ट तरतुदी करण्याचे निर्देश दिले आहेत. बँकांची जबाबदारी केवळ डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यापुरती मर्यादित राहता कामा नये. संशयास्पद व्यवहार वेळीच ओळखणारी यंत्रणा विकसित करणे, असामान्य आर्थिक व्यवहार आढळल्यास ग्राहकांना तातडीने सावध करणे, व्यवहारांच्या सुरक्षेसाठी अद्ययावत तंत्रज्ञान वापरणे आणि फसवणुकीच्या तक्रारींचे तत्परतेने निवारण करणे, या जबाबदाऱ्याही बँकांनी गांभीर्याने पार पाडल्या पाहिजेत. ग्राहकांच्या पैशांच्या सुरक्षेबाबत बँकांना उत्तरदायी धरण्याची वेळ आता आली आहे.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी गती मिळाली आहे. आर्थिक व्यवहारांची सुलभता वाढली असून, सामान्य माणसाचे अनेक व्यवहार काही क्षणांत पूर्ण होऊ लागले आहेत. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. परंतु, डिजिटल व्यवहारांचा विस्तार म्हणजे केवळ तंत्रज्ञानाचा प्रसार नव्हे. त्यासोबत विश्वासार्हता, सुरक्षितता आणि उत्तरदायित्व यांचीही हमी मिळणे आवश्यक आहे. नागरिकांनी डिजिटल व्यवहार करावेत, अशी अपेक्षा सरकार आणि बँका व्यक्त करत असतील, तर त्यांच्या पैशांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली पाहिजे. डिजिटल अर्थव्यवस्थेचे यश केवळ व्यवहारांच्या संख्येवर ठरणार नाही, तर त्या व्यवहारांतून नागरिकांचा पैसा किती सुरक्षित राहतो, यावरच तिची खरी विश्वासार्हता अवलंबून असेल.

–मच्छिंद्र ऐनापुरे,
जत, जि. सांगली

पान १ वरून...

नांदेड जिल्हा न्यायालयाला...

लॅब, अंगुली ठसे व मुद्रा पथक तसेच शीघ्र कृती दलाचे (क्यूआरटी) जवान घटनास्थळी दाखल झाले. बीडीएस पथकाकडून न्यायालयातील प्रत्येक इमारतीची कसून तपासणी सुरू करण्यात आली. संशयास्पद वस्तू किंवा हालचालींचा शोध घेण्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

न्यायालय परिसरातील प्रवेशद्वारे बंद करण्यात आल्याने जिल्हा परिषद परिसर, रेल्वेस्थानक रस्ता आणि न्यायालयाच्या पाठीमागील रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. अचानक न्यायालयीन कामकाज बंद झाल्याने वकील, पक्षकार आणि नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले.

दरम्यान, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि कोणत्याही प्रकारची अप्रमाणित माहिती प्रसारित न करण्याचे आवाहन केले आहे. नांदेडसह राज्यातील हिंगोली, बीड, सांगली, सातारा या जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना एकाच वेळी धमकीचा ई-मेल आल्याने पोलीस यंत्रणेची मात्र धांदल उडाली. धमकीमागील नेमके कारण आणि त्याची सत्यता तपासण्याचे काम पोलीस यंत्रणेकडून सुरू आहे.

पान १ वरून...

कुणबी नोंदी शोधणे...

नाही. तुम्ही माझ्या नादी लागू नका, मी तुम्हाला कधीही सापडणार नाही. तुम्ही माझ्यावर वेळ आणली तर मी तुमच्यावर वेळ आणल्याशिवाय राहणार नाही. मला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करू नका, नाहीतर तुम्हीच अडचणीत आल्याशिवाय राहणार नाही, असा घणाघात त्यांनी केला.

माझ्या समाजाच्या पोरांवर तुम्ही अन्याय करत आहात. २०२९ च्या निवडणुकीमध्ये मी तुम्हाला सोडणार नाही. मराठा समाजातील तरुण कोणत्याही पक्षात रहा, पण आधी तुम्ही मराठा आहात, हे कधीही विसरू नका. आपल्या समाजाच्या लेकरासाठी काम करा. आपल्याच समाजातील काही नेते मराठा समाजाच्या आणि माझ्या विरोधात बोलतात, असे करू नका. समाजासाठी काहीतरी कार्य करा, असे आवाहनही त्यांनी केले.

मराठा समाजातील मुली शिकल्या पाहिजेत, यासाठी मी प्रयत्न करत आहे. मराठा समाजातील मुलांसाठी एक-एक प्रमाणपत्र जोडण्याचा मी प्रयत्न करत आहे, पण सरकार साथ देत नाही. गेल्या एक महिन्यापासून ओबीसी प्रमाणपत्र देणे बंद आहे. हे असे का? आम्ही मराठा समाजाने तुम्हाला सत्तेवर बसवले आहे. तुम्ही फक्त भाषणात मराठा समाजाबद्दल कळवळा दाखवता, पण प्रत्यक्ष कृतीत काहीच करत नाही, अशी खंत जरांगे पाटील यांनी व्यक्त केली.

आरक्षण मिळावे म्हणून समाजातील सातशे-आठशे तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत, त्याची थोडीसुद्धा खंत तुम्हाला वाटत नाही, हे आमचे दुर्दैव आहे. ज्यांना कुणबी प्रमाणपत्र दिले आहे, त्यांचे व्हॅलिडेशन करणे बंद आहे, हे कशासाठी? वैद्यकीय शिक्षण मोफत केले असे सांगता, मग मुलींना फी का आकारली जाते? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

तुम्ही कुणबी नोंदी शोधायचे थांबवू नका, मराठ्यांचे आरक्षण रोखू नका, ही माझी कळकळीची विनंती आहे. तुम्ही जर असे केले तर तुमचे कधीही बरे होणार नाही आणि आम्ही तुम्हाला सोडणार नाही, हे लक्षात ठेवा. हे सरकार मराठा समाजातील विविध कामे करणाऱ्या लोकांना त्रास देत आहे. रद्द केलेले कुणबी प्रमाणपत्र परत द्या, म्हणजे तुमचे आणि माझे संबंध चांगले राहतील, नाहीतर विरोधाला सामोरे जावे लागेल. मराठ्यांनो, आपली मान खाली होऊ देऊ नका, तुमच्यात एकी राहू द्या, मी तुमच्यासोबत आहे, असे ते शेवटी म्हणाले.

या कार्यक्रमास सौ. प्रणिताताई देवरे-चिखलीकर, डॉ. संजय कदम, दैनिक गोदातीर समाचारचे मुख्य संपादक केशव घोणसे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात 'सरकार फाऊंडेशन'च्या बोधचिन्हाचेही अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, जि. प. सदस्या वत्सलाताई पाटील डक, मीनलताई पाटील, माजी आमदार हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर, माजी जि.प. सदस्य दिलीपराव पाटील बेटमोगरेकर, संजय पाटील शेळगावकर, भुजंग पाटील, बाबुराव गिरे, आमदार आनंदराव बोंढारकर, भास्कर पाटील मारतळेकर, कामाजी पवार, गोविंदराव पाटील शिंदे नागेलीकर, नराशाम महाराज येवतीकर, भास्कर पाटील जळगावकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे यांनी केले.

पान १ वरून...

सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा...

आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबूराव कदम कोहळीकर, आमदार आनंद तिडके-बोंढारकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, आरोग्य सेवेचे संचालक (शहरी) डॉ. गोविंद चौधरी, संचालक (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य उपसंचालक डॉ. सतीशकुमार सोळंके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय नवले यांच्यासह जिल्ह्यातील खासगी डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळावा, यासाठी खासगी रुग्णालये व वैद्यकीय संघटनांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र रुग्णांना उपचारांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केले.

खासगी रुग्णालयांशी संबंधित दरनिश्चिती, विविध परवानग्या आणि नूतनीकरण प्रक्रियेतील अडचणी यांसारख्या विषयांवरही त्यांनी चर्चा केली. अग्निसुरक्षा आणि प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित परवानग्यांच्या नुतनीकरण प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी चर्चा करून प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना आवश्यक असलेली माहिती संबंधित रुग्णालयांनी वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शासन आणि खासगी वैद्यकीय क्षेत्र यांच्यात सातत्यपूर्ण संवाद राहिल्यास आरोग्यसेवेतील अडचणी दूर करणे शक्य होईल. डॉक्टरांनी मांडलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करून आवश्यकतेनुसार निर्णय घेण्यात येतील, असेही आरोग्य मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

भोकरच्या एकात्मिक बालविकास प्रकल्पाचा कारभार रामभरोसे!

सर्व विभागांतील सुपरवायझर मुख्यालयाबाहेर; बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या उपस्थितीवरही प्रश्नचिन्ह

भोकर (प्रतिनिधी)– बालकांचे आरोग्य, पोषण, शिक्षण तसेच गर्भवती आणि स्तनदा मातांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असलेल्या भोकर येथील एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्पाचा कारभार सध्या 'रामभरोसे' सुरू असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील सर्व विभागांतील पर्यवेक्षिका (सुपरवायझर) मुख्यालयी राहत नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थ, पालक व लाभार्थी महिलांकडून होत असून, यामुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भोकर तालुक्यात किनी, पाळज, मोघाळी, मातुळ आणि पांढुर्णा आदी विभागांचा समावेश होतो. मात्र, संबंधित विभागांतील एकही पर्यवेक्षिका मुख्यालयी राहत नसल्याचा संतापजनक आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काही पर्यवेक्षिका नांदेड येथून रोज ये-जा करतात, तर काही जणी घरूनच कारभार हाकत आहेत. परिणामी, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच लाभार्थ्यांना आवश्यक कामांसाठी संबंधित अधिकाऱ्यांशी



संपर्क साधताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासनाच्या विविध योजनांतर्गत पात्र लाभार्थी महिलांना मिळणारी 'बेबी केअर किट' वेळेवर उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे. तसेच अंगणवाडीतील बालकांसाठी शासनाकडून प्राप्त होणारे शैक्षणिक व इतर साहित्यही वेळेवर वाटप केले जात नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. याशिवाय, कुपोषित बालकांना आवश्यक असणाऱ्या सकस आहाराचा पुरवठा नियमित होत नसल्याच्या तक्रारी पुढे आल्यामुळे या योजनांचा प्रत्यक्ष लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचतो का, असा सवाल उपस्थित होत आहे.

एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून प्रणयकुमार चॅटलावार कार्यरत आहेत; परंतु त्यांच्या भोकर कार्यालयातील उपस्थितीबाबतही नागरिकांकडून साशंकता व्यक्त केली जात आहे. त्यांच्याकडे उमरी व हिमायतनगरचाही अतिरिक्त कार्यभार असल्याने ते भोकर कार्यालयातील कामकाजाकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नसल्याचा आरोप होत आहे. या अतिरिक्त कार्यभाराचा नियमित कामकाजावर होणारा परिणाम लक्षात घेता, वरिष्ठ स्तरावरून या प्रकरणाची तपासणी होणे गरजेचे बनले आहे.

एकात्मिक बालविकास प्रकल्प हा केवळ कागदोपत्री कामकाजापुरता मर्यादित नसून तो हजारो बालके, गर्भवती आणि स्तनदा मातांच्या आरोग्याशी निगडित आहे. अशा संवेदनशील विभागातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी न राहणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.

मुख्यालयी राहण्याबाबतच्या शासन नियमांचे पालन होत आहे का? संबंधितांना मिळणारा घरभाडे भत्ता व इतर सुविधांची नेमकी पात्रता काय? याची कसून चौकशी करण्याची मागणी होत आहे. तसेच नियमबाह्य लाभ घेतल्याचे निष्पन्न झाल्यास कठोर कारवाई करावी आणि बेबी केअर किट, पोषण आहार व साहित्य वाटपातील अनियमिततेची सखोल चौकशी करावी, असा सूर नागरिकांम धून आळवला जात आहे.

आता जिल्हा प्रशासन आणि महिला व बालविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी या गंभीर तक्रारींची दखल घेऊन भोकर प्रकल्पाची प्रत्यक्ष तपासणी करणार का, की बालकांच्या पोषणाचा हा महत्त्वाचा विभाग असाच वारवाऱ्यावर सोडला जाणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

सोनखेडच्या गरजू रुग्णांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार उपचार द्या!

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे प्राथमिक आरोग्य केंद्राला भेटीदरम्यान निर्देश

नांदेड (प्रतिनिधी)– लोहा तालुक्यातील सोनखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या गरजू रुग्णांना स्थानिक पातळीवरच वेळेवर, सुलभ आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात. किरकोळ तसेच उपचारयोग्य आजारांसाठी रुग्णांना अन्यत्र पाठविण्याचे प्रमाण कमी करावे, असे स्पष्ट निर्देश राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य संवाद यात्रेदरम्यान त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन उपलब्ध आरोग्य सुविधा, प्रसूती सेवा आणि नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली.

प्राथमिक आरोग्य केंद्रात अधिकाधिक प्रसूती होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. गर्भवती मातांना आवश्यक तपासण्या, समुपदेशन आणि उपचार वेळेत उपलब्ध करून द्यावेत. तसेच डीटी, टीटी आणि रेबीज प्रतिबंधक लसींसह सर्व जीवनावश्यक औषधांचा पुरेसा साठा कायम उपलब्ध ठेवावा. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने



वैद्यकीय मदत मिळण्यासाठी १०२ व १०८ रुग्णवाहिका सेवांची माहिती गावागावांत पोहोचवून जनजागृती करावी, अशा सूचनाही आरोग्यमंत्री आबिटकर यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

यावेळी आरोग्य मंत्री आबिटकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीच्या सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी करून कामाच्या प्रगतीचा व गुणवत्तेचा आढावा घेतला. बांधकामाचा दर्जा उत्तम राखावा तसेच आवश्यक त्या दुरुस्त्या व सुधारणा वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले. नागरिकांशी थेट संवाद साधून आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या.

आरोग्य संवाद यात्रेदरम्यान आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सोनखेड येथील लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. स्थानिक आरोग्य सुविधांबाबतच्या त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. नागरिकांना आरोग्य सेवा मिळविताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक संवेदनशीलतेने व जबाबदारीने काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाची नांदेडमध्ये अवैध वाळू, तर लातुरात जुगाराविरुद्ध कारवाई

११ इसमांविरुद्ध कारवाई; १ कोटी ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस पथक नांदेड व लातूर जिल्ह्यात रवाना केले होते.

नांदेड जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर अवैध रेती विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकास नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पिंपळगाव निमजी शिवारात पाठविले होते. या पथकाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी मौजे पिंपळगाव निमजी शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. या कारवाईत पथकाने १ हायवा, इंजिन बोट, फायबर बोट व ४ तराफे असा एकूण



८६,७०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरन १४०९/२०२६ कलम ३०३ (२), ३(५) भारतीय न्याय संहिता, सह कलम कलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, ९,१५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम व ३,७ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

तद्नंतर पथकाने लातूर जिल्ह्यातील औराद शहाजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावरी ते तगरखेडा जाणारे रोडवरील रमेश थेटे यांचे शेडमध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत ३५,९००/-रुपयांची रोकड, ११ मोबाईल, २ चारचाकी वाहने व ५ मोटारसायकली असा एकूण १८,५५,९००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण ११ इसमांविरुद्ध कारवाई करुन त्यांचेविरुद्ध औराद शहाजनी पोलीस ठाणे येथे गुरनं २८४/२०२६ कलम १२ (अ), ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे.

उपरोक्त दोन्हीही कारवायांत पथकाने एकूण ११ इसमांकडून ३५,९००/- रुपयांची रोकड, ११ मोबाईल, २ चारचाकी वाहने, ५ मोटारसायकली, एक हायवा, इंजिन बोट, फायबर बोट व ४ तराफे असा एकूण १,०५,२५,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. गणेश राठोड, पोहेकॉ. संदीप वाघाडे व पोहेकॉ. गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

दिल्लीतील आंदोलनात खा.रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांचा सहभाग

नांदेड (प्रतिनिधी)– देशातील लोकशाही व्यवस्था व निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या प्रश्नावर दिल्ली येथे आयोजित विरोधी पक्षांच्या आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीकडे रवाना झालेले शेकडो कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले. लोकशाही व संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी नांदेडच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीच्या आंदोलनात आपली ताकद दाखवून दिली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता, मतदार याद्यांमधील त्रुटी, मतदारांच्या मतदानाच्या अधिकारासंदर्भातील प्रश्न आणि निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेबाबत विरोधकांनी गंभीर आक्षेप उपस्थित केले आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे इंडिया आघाडीच्या



वतीने जनमहाभियोग प्रस्तावाच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात खा. रवींद्र चव्हाण, विठ्ठल पावडे (उत्तर जिल्हाध्यक्ष), अब्दुल गफार (शहराध्यक्ष), प्रा. यशपाल भिंगे, ॲड. सुरेंद्र घोडजकर, डॉ. श्रावण रॅपनवाड, तिरुपती कोंढेकर, राजेश पावडे, महेश देशमुख, डॉ. रेखा चव्हाण, ललिता कुंभार, गणेश धागे, अरविंद क्षीरसागर, सोपान बोने, शंकर बाजीराव शिंदे, अंबादास रताळे, प्रकाश दीपके, गणेश कोकाटे, आशिष शिंदे, अक्षय नळगे, अझहर शेख, प्रथमेश गिरी, श्यामराव पाटील मनाठकर, बाळासाहेब देशमुख आंबेगावकर, दादाराव पाटील पुईयाड, श्याम पाटील रोहीपिंपळगावकर, नंदकुमार देशमुख उंचेगावकर, अब्दुल अजीज कुरेशी, शेर अली, डॉ. अब्दुल बाकी, बाबुभाई खोकेवाले, वाजिद जहागिरदार, मुंतजीबुद्दीन, अलीम खान, जावेद चौस, जावेद जेडी, फारूक अली खान, डॉ. दिनेश निखाते, आकाश जाधव, संजय कवठेकर, मोहम्मद सादेक अब्दुल सत्तार, वाजिद अन्सारी, इमरान खान, उमेर शेख, रफिक बागवान, सय्यद रेहान, सय्यद अजगर, विखर पैलवान, संभाजी पाटील उंड्रीकर, नवले प्रकाश निळमवाड, विलास पाटील गवळेवाडीकर, प्रकाश भगनुरे व मधुकर दिघे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.

लोकशाही ही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून ती जनतेच्या अधिकारांची आणि संविधानिक मूल्यांची ओळख आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष असावी, प्रत्येक मतदाराचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा आणि लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास कायम राहावा या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी दिल्लीतील आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन पक्षाची एकजूट आणि लोकशाहीप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित केली. नांदेडच्या कार्यकर्त्यांचा हा सहभाग जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात चर्चेचा विषय ठरला आहे.

किनवटमध्ये तिर्रट जुगारावर पोलिसांची धाड; चौघेजण ताब्यात

किनवट (प्रतिनिधी)– किनवट तालुक्यातील घोटी फाटा ते मलकापूर खेरडा रोडवरील शेतशिवारात सुरू असलेल्या तिर्रट जुगारावर किनवट पोलिसांनी धाड टाकून चार जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी ११ हजार ४०० रुपये रोख रक्कम आणि ५२ बदक छाप पत्त्यांचा संच जप्त केला.

शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास मारुती शिवाजी कदम यांच्या शेतातील टिनच्या शेडमध्ये काहीजण तिर्रट नावाचा जुगार पैसे लावून खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत शंकर मरीबा मानकर (रा. गंगानगर किनवट), बालाजी गोविंद राठोड (रा. सरदार नगर किनवट), मारुती शिवाजी कदम (रा. घोटी) आणि अभिजित राम कऱ्हाळे (रा. कमठाला) या चौघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून एकूण ११ हजार ४०० रुपयांची रोकड तसेच पत्ते जप्त करण्यात आले.

पोक्सो कायद्याविषयी जनजागृती काळाची गरज -न्या. माने



किनवट (प्रतिनिधी)– बालपण हा आयुष्यातील सर्वांत सुंदर काळ आहे. या काळात प्रत्येक बालकाला सुरक्षितता, प्रेम, सन्मान आणि विश्वास मिळणे आवश्यक आहे. मात्र, बालकांवरील अत्याचार, लैंगिक शोषण आणि बालहक्कांचे उल्लंघन या गंभीर समस्यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे तसेच बालकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने यांनी केले.

येथील सरस्वती विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत तालुका विधी सेवा समितीच्यावतीने आयोजित 'सुरक्षित बचपन अभियान' आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (पोक्सो) कायदा, २०१२ या विषयावरील अखिल भारतीय शालेय जनजागृती मोहिमेच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी सह दिवाणी न्यायाधीश के. जी. मेंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड. एस. पी. दारवंडे, ॲड. आर. डी. सोनकांबळे तसेच अधिकार मित्र (पी.एल.व्ही.) व उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून बालसुरक्षेचे महत्त्व, पोक्सो कायद्यातील तरतुदी आणि बालकांच्या हक्कांविषयी कायदेविषयक व शैक्षणिक दृष्टिकोनातून माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. विलास सूर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचालन अधिकार मित्र (पी.एल.व्ही.) उत्तम कानिंदे यांनी केले. शिक्षिका राधिका तिरमनवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमास शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आदिवरद नेम्माणीवार, कला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी, ॲड. दिलीप काळे, ॲड. संकेत राठोड, ॲड. एस. एम. सर्पे, न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक एम. के. शेख, अधिकार मित्र (पी.एल.व्ही.) दत्ता भालेराव, प्रवीण पाटील, पैरवी अधिकारी पी. एन. गुरनुले, पोलीस कॉन्स्टेबल वागतकर तसेच न्यायालयीन कर्मचारी भारत राठोड यांची उपस्थिती होती.



नांदेड/नवी दिल्ली –नवी दिल्ली येथील रामलीला मैदानावर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आयोजित आंदोलनासाठी महाराष्ट्रातून काँग्रेसचे पदाधिकारी दिल्ली येथे उपस्थित होते. यात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस डॉ. दिनेश निखाते, भीमशक्ती जिल्हाध्यक्ष सुरेश हटकर, भीमशक्ती शहराध्यक्ष संजय कवठेकर, नांदेड शहर काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष अंबादास रातोळे, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष गणेश कोकाटे, प्रकाश दिपके, मिलिंद लोकरे, प्रथमेश गिरी आदींचा समावेश होता. यावेळी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यसभेचे खासदार तथा माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे यांची दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

ताणमुक्त जीवनासाठी 'स्वीकार भाव' आणि सकारात्मक विचार महत्त्वाचे –मुरारी पावडे





नांदेड (प्रतिनिधी)– ताणमुक्त जीवन जगण्यासाठी परिस्थितीचा स्वीकार आणि सकारात्मक विचारसरणी महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन मुरारी पावडे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गणितीयशास्त्रे संकुल आणि तेजज्ञान फाउंडेशन नांदेड केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'लाइफ बियॉन्ड स्ट्रेस' या कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. अध्यक्षस्थानी संकुलाच्या संचालिका डॉ. आर. एस. जैन होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. जे. एन. कुलकर्णी, शैलेश हळदेकर आणि भरत कुलकर्णी यांचा समावेश होता.

कार्यशाळेत वर्तमान क्षणात जगणे, मनाशी सकारात्मक संवाद साधणे आणि तणावाचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व डॉ. जैन यांनी अधोरेखित केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. नितीन दारकुंडे होते.

पर्यावरणपुरक जीवनशैलीचा संकल्प; नांदेड जिल्ह्यात 'ब्रिक्स शाश्वत जीवनशैली सप्ताह'

- नागरिकांनी अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा–मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे आवाहन
- प्लास्टिकमुक्ती, कचरा व्यवस्थापन, जलस्रोत संवर्धन व स्वच्छतेसाठी विविध उपक्रम

नांदेड (प्रतिनिधी)– पर्यावरणाचेसंवर्धन, नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने वापर आणि स्वच्छतेच्या चळवळीत लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात १ ते ७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'ब्रिक्स शाश्वत जीवनशैली सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहानिमित्त जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, युवक मंडळे, महिला मंडळे, बचत गट आणि विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून जनजागृतीपर तसेच कृतीशील उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून पर्यावरणपुरक जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

भारताच्या २०२६ मधील ब्रिक्स अध्यक्षपदाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या वतीने देशभरात या सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. 'मिशन लाईफ'च्या सात प्रमुख संकल्पनांवर आधारित या अभियानातून पर्यावरणपुरक जीवनशैलीचा प्रसार, नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि नागरिकांच्या दैनंदिन सवयींमध्ये सकारात्मक बदल घडविण्यावर भर देण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या उद्दिष्टांशी सुसंगतपणे जिल्ह्यात एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळणे, ई-कचऱ्याचे प्रमाण कमी करणे आणि कचऱ्याची निर्मिती रोखणे यासाठी विशेष जनजागृती करण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत नागरिकांना माहिती देणे, घरगुती स्तरावर कचऱ्याचे चार प्रकारांत वर्गीकरण करण्यासाठी प्रबोधन करणे तसेच प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी वापर कमी करणे, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण या त्रिसूत्रीचा प्रसार करण्यात येणार आहे.

ग्रे-वॉटर अर्थात घरगुती वापरानंतर निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, शासकीय कार्यालयांचे परिसर आणि जलस्रोतांची स्वच्छता राखण्यासाठी विशेष स्वच्छता मोहिमा राबविण्यात येणार आहेत. कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत स्वच्छतेच्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामस्तरावर लोकसहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

या सप्ताहाच्या माध्यमातून केवळ पर्यावरणविषयक जनजागृती न करता पर्यावरणपुरक सवयी दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पाणी, ऊर्जा आणि नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर, प्लास्टिकचा मर्यादित वापर, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि परिसर स्वच्छ ठेवणे यांसारख्या कृतींमधून शाश्वत जीवनशैलीची चळवळ अधिक व्यापक करण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत, शाळा, युवक मंडळे, महिला मंडळे, बचत गट, शासकीय विभाग आणि नागरिकांनी या सप्ताहात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. लोकसहभागातून स्वच्छ, सुंदर, हरित आणि पर्यावरणपूरक गावांच्या निर्मितीस हातभार लावावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील आणि जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड यांनी केले आहे.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला मुदतवाढ

नांदेड (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेला भारत निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार मतदार यादीतील नावांबाबतचे दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत आता १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच दावे आणि हरकतींच्या नोटीस टप्प्यातील कार्यवाही व त्यांचा निपटारा करण्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली असून, अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत असेल. नोटीस टप्पा आणि दावे-हरकतींचा निपटारा २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. मतदारांना आपले नाव, तपशील तसेच मतदार यादीतील नोंदी तपासून आवश्यक दावे व हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (CDCPR) मध्ये उक्त अधिनियमाचे कलम ३७(१अअ) अन्वये 'महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०२४' नुसार प्रस्तावित फेरबदलाची सूचना.
- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१ककक) खालील सूचनेसह कलम १५४(१) खालील निदेश.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,
दिनांक:-२१ सप्टेंबर, २०२६

सूचना

क्रमांक :- टिपीबी-४३२६/११९८/प्र.क्र.१०७/२०२६/ नवि-११

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१ चे प्रकरण VI च्या तरतुदी लागू होणारे क्षेत्र किंवा इतर जमीन ज्या शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरीत केल्या आहेत, अशा जमिनींकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे.) कलम ४० (१अ) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा केला आहे.) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोट कलम (२) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी-४३२२/३१४/ प्र.क्र.२५/ २०२३/ नवि-११ द्वारे उक्त प्राधिकरणाचे सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा केला आहे.) मंजूरी दिली असून ती शासकीय राजपत्रात दि.१३ जुलै, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे:

ज्याअर्थी, राज्यातील पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी तसेच राज्यातील पर्यटनाला आणखी चालना देण्यासाठी आणि महाराष्ट्राला आघाडीचे राज्य म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी राज्यशासनाचे पर्यटन विभागाने मा. मंत्री मंडळाच्या मान्यतेने शासनाचे पर्यटन विभागाने 'महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०२४' निर्गमित केले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त धोरण" असा केला आहे.); आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणास CDCPR मध्ये पर्यटन धोरणास अनुरून सुधारणांचे प्रारुप तयार करून नगर विकास विभागाचे स्तरावर पुढील कार्यवाही करणेकरीता उपलब्ध करून देणेबाबत नगर विकास विभागाकडील दि.२५/०४/२०२५ रोजीचे पत्राद्वारे उक्त प्राधिकरणास कळविले असता उक्त प्राधिकरणाने दि.२७/१०/२०२५ रोजीचे पत्राद्वारे सदरहु प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, वरील विचारात घेता, उक्त नियमावलीतील तरतूदी उक्त धोरणातील तरतूदींशी सुसंगत असण्याकरिता उक्त धोरणातील तरतुदींचे अनुरूप उक्त नियमावलीतील संबंधित तरतूदींमध्ये सदर सूचनेसोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१अअ) अन्वये प्राप्त अधिकारात आणि अनुषंगिक शक्तींचा वापर करुन, प्रस्तावित फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. प्रस्तावित फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४(१) अन्वये निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१अअ) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल.

ही सूचना, शासकिय कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.
२. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद विभाग.
३. सर्व विभागीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(निर्मलकुमार चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट-अ

(शासन नगर विकास विभागाकडील सूचना क्र. टिपीबी-४३२६/११९८/प्र.क्र.१०७/२०२६/ नवि-११, दिनांक:-२१ सप्टेंबर, २०२६ सोबतचे परिशिष्ट.)

Regulation No.	Existing Provision	Proposed Provision
1.3 Definitions **111. Occupancy or Use Group**	NIL	***xvii. (New) Tourism/Hospitability Building/Establishment means an establishment which is in the business of developing tourism and hospitability related activities as approved by DoT/Ministry of Tourism (MoT), Govt. of India.***
4.2 Land use Classification **4.2.1 Industrial Zone**	NIL	4.2.1 iv) Following uses may also be permitted. ***s) (New) Tourism/hospitability buildings/Establishments related Provided that; the area carmarked under tourism/hospitability area shall not be counted under support uses in terms of the proviso below.***
5.5 PERMISSIBLE FSI	Permissible basic FSI, FSI on payment of premium on a plot for all types of buildings (e.g. industrial, pharm industry, IT/ITES, bio-technology, nano-technology, data center, hotels, medical, educational, institutional, Government / semi-Government, flatted galas, residential, commercial etc.) shall be as given in Table No. 5 D below:-	Permissible basic FSI, FSI on payment of premium on a plot for all types of buildings (e.g. industrial, pharm industry, IT/ITES, bio-technology, nano-technology, data center, hotels, medical, educational, institutional, Government / semi-Government, flatted galas, residential, commercial, ***tourism/hospitability*** etc.) shall be as given in Table No. 5 D below:-
5.12 Provision of Recreational Floor	In case of residential, commercial, IT/ITES, Fintech building having height more than 50 m, recreational floor may be allowed subject to following - i) the height of such floor shall be upto 4.5 m and shall be open on all sides, ii) such floor shall be used for recreational purpose / activities of open nature, including construction of swimming pool and shall be in addition to the recreational open space required as per CDCPR, iii) such floor shall not be counted in FSI, however, ancillary constructions like changing room, wash room, etc. shall be computed in FSI. iv) one such floor may be allowed at every 50 m height, however, first such recreational floor may be allowed after 30 m height and height difference between two such recreational floors shall not be less than 24 m	In case of residential, commercial, IT/ITES, Fintech building having height more than 50 m, ***and in case of hotel building having height more than 15 m*** recreational floor may be allowed subject to following - i) the height of such floor shall be upto 4.5 m and shall be open on all sides, ii) such floor shall be used for recreational purpose / activities of open nature, including construction of swimming pool and shall be in addition to the recreational open space required as per CDCPR, iii) such floor shall not be counted in FSI, however, ancillary constructions like changing room, wash room, etc. shall be computed in FSI. iv) ***except for hotel buildings*** one such floor may be allowed at every 50 m height, however, first such recreational floor may be allowed after 30 m height and height difference between two such recreational floors shall not be less than 24 m v) ***in case of hotel building one such floor may be allowed at every 20 m height, however, first such recreational floor may be allowed after 15 m height.***
CHAPTER-6 HIGHER FSI FOR CERTAIN USES		***6.11 (New) REGULATIONS FOR DEVELOPMENT OF TOURISM/ HOSPITABILITY ESTABLISHMENT*** ***Development of tourism/hospitability Establishments shall be regulated as per the Tourism Policy- 2024 as declared by Tourism Department vide Government Resolution No.TDS-2022/09/CR No 542/Tourism-4, dated 18/07/2024, and as amended from time to time and the regulations as mentioned below :-*** ***Additional FSI and Space Utilization of Tourism units/Hospitability Park.*** ***i. Additional FSI over and above basic permissible FSI may be provided on basis of the following table for all Tourism units/Hospitability Parks applicable only to the Tourism projects eligible under Tourism Policy of Maharashtra-2024 and Tourism projects certified by the Tourism Department as per the Tourism Policy of Maharashtra- 2024 in the Greater Mumbai region and rest of Maharashtra.***

Table No.6 I

Sr. No.	Minimum Road Width	Maximum Permissible FSI Greater Mumbai Region	Maximum Permissible FSI Rest of Maharashtra
1	12 m	Up to 3	Up to 3
2	18 m	Up to 4	Up to 3.5
3	27 m	Up to 5	Up to 4

Premium Rates for the Tourism Premium Units/ Hospitability Park :-

a. For all public and Private Hospitability Parks in Brihanmumbai Municipal Corporation area, Additional FSI shall be admissible by levying a premium at the rate of 50% of prevailing rate of premium to be charged for the area as mentioned in the MIDC CDCPR.
b. For the industrial area in Vidarbha, Marathawada, Dhule, Nagpur, Ratnagiri and Sindhudurg, no premium shall be charged for additional Floor Space Index (FSI)/ToD/Ancillary FSI.
c. For Central Business District:- If any area is declared as a Central Business District as per regulation no.6.10 under these regulations, then all registered public and private Tourism units/Hospitability Parks, in the particular CBD's will be entitled for permissible additional FSI by levying a premium at the rate of 50% of the existing rate as mentioned in the CDCPR.
d. In addition, other applicable FSI's like ancillary FSI will be applicable as per these regulations.
e. The developer may pay the premium charges for the additional FSI for the Tourism units/ Hospitability park in installments as specified in Regulation no.2.2.15.

ii. Mix land use development is allowed. However, incentive under this policy will be limited to area and assets developed, owned and used for tourism purpose only. The other non-tourism assets not having any incentives within the project such as villas, institutes, village /small scale industries, shall be to disposable vide sale or long lease etc. to the discretion of the proponent.

iii. In case of MIDC layouts, tourism activities permitted in separately earmarked contiguous Tourism/hospitability area for Tourism/hospitability related activities.

The percentage of such area to be earmarked in MIDC layouts and model of development of such area shall be decided by the Authority.

Provided also that; the area earmarked under tourism/hospitability area shall not be counted under support uses in terms of the proviso mentioned in the last paragraph of regulation no. 4.2.1.

(निर्मलकुमार चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

- Proposed Modification to Comprehensive Development Control and Promotion Regulations (CDCPR) of MIDC under Section 37(1AA) of the said Act as per 'Maharashtra Tourism Policy-2024'.
- Notice under section 37 (1AA) read with directions u/s 154 of the said Act.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated: -21st September, 2026

NOTICE

No. TPB- 4326/1198/ C.R.107/2026/UD-11

Whereas, the 'Maharashtra Industrial Development Corporation' is deemed to have been appointed as the 'Special Planning Authority' (hereinafter referred to as "the said Authority"), by virtue of the provisions of sub section 1A of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") over any area where Chapter VI of the Maharashtra Industrial Development Corporation Act, 1961 applies or any other area comprising government land transferred to the Maharashtra Industrial Development Corporation (hereinafter referred to as "MIDC");

(उर्वरीत पान ५ वर...)

(पान ४ वरून...)

And whereas, the Government of Maharashtra, in exercise of the powers conferred under sub section (2) of Section 37 of the said Act, has accorded sanction to the Comprehensive Development Control and Promotion Regulations (CDCPR) of MIDC (hereinafter referred to as "the said Regulations") vide Notification No. TPB-4322/314/C.R.25/2023/UD-11, dated 05/07/2023, which are published in Government Gazette dt.13th July, 2023;

Whereas, with the approval of the Hon'ble Cabinet, the Tourism Department of the State Government has issued the 'Maharashtra Tourism Policy-2024' (hereinafter referred to as the "said Policy") with the objective of developing the tourism sector, further boosting tourism within the State, and promoting Maharashtra as a leading state; And whereas, the Urban Development Department had informed the said Authority by letter dated 25/04/2025 to prepare a draft to amendment CDCPR in alignment with the tourism policy and submit it for further action to the State Government, the said Authority has submitted the said proposal to the Government vide its letter dated 27/10/2025.

And whereas, considering the above, the Government is of the opinion that, it is necessary to modify the relevant provisions of the said Regulations as per the provisions given in the said Policy as specifically mentioned in Schedule-A appended with this Notice, so that, the provisions of the said Regulations will be in consonance with the provisions given in the said Policy (hereinafter referred as "the Proposed modification");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect to the proposed modifications. Any objections/suggestions upon the proposed modifications shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as an Officer to hear objections/suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government.

Further, the State Government hereby issues directives under Section 154(1) of the said Act that, pending sanction to the proposed modification under clause (C) of Section 37(1AA) of the said Act by the Government, the proposed modification shall come into force forthwith.

This notice is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all Government working days.

1. Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation, Andheri, Mumbai.
2. The Divisional Joint Director of Town Planning. Konkan / Pune/ Nashik / Nagpur / Amravati/Aurangabad.
3. All Divisional Officers, Maharashtra Industrial Development Corporation.

This Notice under sub-section (1AA) of Section 37 of the said Act shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(Nirmalkumar Chaudhari)
Deputy Secretary to Government

SCHEDULE-A

(Schedule appended to the Government in Urban Development Department's Notice No. TPB- 4326/1198/ C.R.107/2026/UD-11 Dated- 21st September, 2026)

Regulation No.	Existing Provision	Proposed Provision
1.3 Definitions **111. Occupancy or Use Group**	NIL	***xvii. (New) Tourism/Hospitability Building/Establishment means an establishment which is in the business of developing tourism and hospitability related activities as approved by DoT/Ministry of Tourism (MoT), Govt. of India.***
4.2 Land use Classification **4.2.1 Industrial Zone**	NIL	4.2.1 iv) Following uses may also be permitted. *s) (New) Tourism/hospitability buildings/Establishments related Provided that; the area earmarked under tourism/hospitability area shall not be counted under support uses in terms of the proviso below.*
5.5 PERMISSIBLE FSI	Permissible basic FSI, FSI on payment of premium on a plot for all types of buildings (e.g. industrial, pharm industry, IT/ITES, bio-technology, nano-technology, data center, hotels, medical, educational, institutional, Government / semi-Government, flatted galas, residential, commercial etc.) shall be as given in Table No. 5 D below:-	Permissible basic FSI, FSI on payment of premium on a plot for all types of buildings (e.g. industrial, pharm industry, IT/ITES, bio-technology, nano-technology, data center, hotels, medical, educational, institutional, Government / semi-Government, flatted galas, residential, commercial, *tourism/hospitability* etc.) shall be as given in Table No. 5 D below:-
5.12 Provision of Recreational Floor	In case of residential, commercial, IT/ITES, Fintech building having height more than 50 m, recreational floor may be allowed subject to following - i) the height of such floor shall be upto 4.5 m and shall be open on all sides, ii) such floor shall be used for recreational purpose / activities of open nature, including construction of swimming pool and shall be in addition to the recreational open space required as per CDCPR, iii) such floor shall not be counted in FSI, however, ancillary constructions like changing room, wash room, etc. shall be computed in FSI. iv) one such floor may be allowed at every 50 m height, however, first such recreational floor may be allowed after 30 m height and height difference between two such recreational floors shall not be less than 24 m	In case of residential, commercial, IT/ITES, Fintech building having height more than 50 m, ***and in case of hotel building having height more than 15 m*** recreational floor may be allowed subject to following - i) the height of such floor shall be upto 4.5 m and shall be open on all sides, ii) such floor shall be used for recreational purpose / activities of open nature, including construction of swimming pool and shall be in addition to the recreational open space required as per CDCPR, iii) such floor shall not be counted in FSI, however, ancillary constructions like changing room, wash room, etc. shall be computed in FSI. iv) ***except for hotel buildings*** one such floor may be allowed at every 50 m height, however, first such recreational floor may be allowed after 30 m height and height difference between two such recreational floors shall not be less than 24 m v) ***in case of hotel building one such floor may be allowed at every 20 m height, however, first such recreational floor may be allowed after 15 m height.***
CHAPTER-6 HIGHER FSI FOR CERTAIN USES		***6.11 (New) REGULATIONS FOR DEVELOPMENT OF TOURISM/ HOSPITABILITY ESTABLISHMENT*** ***Development of tourism/hospitability Establishments shall be regulated as per the Tourism Policy- 2024 as declared by Tourism Department vide Government Resolution No.TDS-2022/09/CR No 542/Tourism-4, dated 18/07/2024, and as amended from time to time and the regulations as mentioned below :-*** ***Additional FSI and Space Utilization of Tourism units/Hospitability Park.*** ***i. Additional FSI over and above basic permissible FSI may be provided on basis of the following table for all Tourism units/Hospitability Parks applicable only to the Tourism projects eligible under Tourism Policy of Maharashtra-2024 and Tourism projects certified by the Tourism Department as per the Tourism Policy of Maharashtra- 2024 in the Greater Mumbai region and rest of Maharashtra.***

Table No.6 I

Sr. No.	Minimum Road Width	Maximum Permissible FSI Greater Mumbai Region	Maximum Permissible FSI Rest of Maharashtra
1	*12 m*	*Up to 3*	*Up to 3*
2	*18 m*	*Up to 4*	*Up to 3.5*
3	*27 m*	*Up to 5*	*Up to 4*

Premium Rates for the Tourism Premium Units/ Hospitability Park :-

a. For all public and Private Hospitability Parks in Brihanmumbai Municipal Corporation area, Additional FSI shall be admissible by levying a premium at the rate of 50% of prevailing rate of premium to be charged for the area as mentioned in the MIDC CDCPR.
b. For the industrial area in Vidarbha, Marathawada, Dhule, Nagpur, Ratnagiri and Sindhudurg, no premium shall be charged for additional Floor Space Index (FSI)/ToD/Ancillary FSI.
c. For Central Business District:- If any area is declared as a Central Business District as per regulation no.6.10 under these regulations, then all registered public and private Tourism units/Hospitability Parks, in the particular CBD's will be entitled for permissible additional FSI by levying a premium at the rate of 50% of the existing rate as mentioned in the CDCPR.
d. In addition, other applicable FSI's like ancillary FSI will be applicable as per these regulations.
e. The developer may pay the premium charges for the additional FSI for the Tourism units/ Hospitability park in installments as specified in Regulation no.2.2.15.

ii. Mix land use development is allowed. However, incentive under this policy will be limited to area and

	Width	Greater Mumbai Region	Rest of Maharashtra
1	*12 m*	*Up to 3*	*Up to 3*
2	*18 m*	*Up to 4*	*Up to 3.5*
3	*27 m*	*Up to 5*	*Up to 4*

Premium Rates for the Tourism Premium Units/ Hospitability Park :-

a. For all public and Private Hospitability Parks in Brihanmumbai Municipal Corporation area, Additional FSI shall be admissible by levying a premium at the rate of 50% of prevailing rate of premium to be charged for the area as mentioned in the MIDC CDCPR.
b. For the industrial area in Vidarbha, Marathawada, Dhule, Nagpur, Ratnagiri and Sindhudurg, no premium shall be charged for additional Floor Space Index (FSI)/ToD/Ancillary FSI.
c. For Central Business District:- If any area is declared as a Central Business District as per regulation no.6.10 under these regulations, then all registered public and private Tourism units/Hospitability Parks, in the particular CBD's will be entitled for permissible additional FSI by levying a premium at the rate of 50% of the existing rate as mentioned in the CDCPR.
d. In addition, other applicable FSI's like ancillary FSI will be applicable as per these regulations.
e. The developer may pay the premium charges for the additional FSI for the Tourism units/ Hospitability park in installments as specified in Regulation no.2.2.15.

ii. Mix land use development is allowed. However, incentive under this policy will be limited to area and

विमाका/लातूर/जाहिरात क्र. ७५/२०२६-२७

Change In Name

My old Name is **Samreen Bagum Syed Rasool** Which now I am Changing as New Name **Samreen Begum Syed Rasul** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: C/O Samreen Begum Syed Rasul. 1-4-436 Maqdoom nagar phule market Nanded

नगर परिषद कंधार जि. नांदेड

जाहीर निविदा नपकं/पापुवस्ववी/२०२६/

मुख्याधिकारी नगर परिषद कंधार जि. नांदेड हे पाणी पुरवठा विभागात आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत २ बोरवेल करणे या कामासाठी शासनाचे योग्य त्या वर्गातून नोंदणीकृत कंत्राटदार जे पूर्व अर्हता अटी पूर्ण करतील अशा ठेकेदारांकडुन फक्त ऑफलाईन पध्दतीने निविदा मागवित आहेत. या निविदेच्या पुर्व अर्हता अटी व सविस्तर निविदा सुचना तसेच यापुढील सर्व सूचना पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग नगर परिषद कंधार येथे दि.०३/११/२०२६ ते दि.१०/११/२०२६ पर्यंत पाहता येतील. येथे नमूद कोणतीही निविदा कुठल्याही कार्यालयीन टप्प्यावर कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारणे, आवश्यकतेनुसार फेर बदल, मुदतवाढ ई. करण्याचा पूर्ण हक्क मुख्याधिकारी, नगरपरिषद कंधार यांनी राखून ठेवलेला आहे.

स्वा./-
(संदीप भोळे)
मुख्याधिकारी नगर परिषद कंधार

Change In Name

My old Name is **Balaji Kamaji Ingole** Which now I am Changing as New Name **Balaji Kamajirao Ingole** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: Balaji Kamajirao Ingole Pali Nagar, Nanded Mo.No. 9766243981

Change In Name

I Smita **Bhagwanrao Patil** declares that my father **Bhagwanrao Patil** and **Bhagwanrao Dinkale Patil** are both the same name of person. My date of birth 27/08/1981 address Ho. No. 1/19/596 plot. No. 23. Shyam Nagar Nanded - 431602
Mobile: 7741806792

Change In Name

My old Name is **SHAIKH REHANA SHAIKH MALANG** Which now I am Changing as New Name **REHANA ABDUL HAADI SHAIKH** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: H.No.4-5-264/1, Barkatpura, VTC Kamareddy, Kamareddy 503111 Telangana Mo.No. 9390365017

जाहिर प्रगटन

भोकर येथील जिल्हा न्यायाधीश-१, भोकर यांच्या न्यायालयात.
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४८/२०२६
मोहम्मद उमान विरूध्द निरंक

ज्या अर्थी अर्जदार साहेरा बेगम अब्दुल रहेमान, वय- ४१ वर्ष व्यवसाय-घरकाम, रा. घर क्र.९-५-९९५- पाकीजा नगर बिलाल मसजिद देगलुर नाका, नांदेड यांनी आपला अज्ञान मुले नावे-१. मोहम्मद उमान अब्दुल रहेमान, वय- १६ वर्ष व्यवसाय-शिक्षण , २. अनशिरा हुदा अब्दुल रहेमान, वय-१० वर्ष, व्यवसाय--, (अर्जदार क्र. १ व २ यांचे अ.पा.क आई साहेरा बेगम अब्दुल रहेमान) रा. पहिला मंजला ग्लोबल कॉम्पलेक्स निशान शाहबाजर जवळ औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद यांनी **Guardians and Wards Act VIII of 1890 u/s 29** च्या तरतुदीनुसार नगरपरिषद हिमायतनगर ता.हिमायतनगर, जि. नांदेड यांचे हद्दीतील अधिकार स्थळ-सिमेतील शेत जमीन खालीलप्रमाणे-

अ.क्र.	गट क्र.	क्षेत्र
1	२८५	१ हे. ७० आर

ज्याची उपरोक्त शेतजमीन अज्ञान मुले यांच्या नावे असलेली सामाईक वडीलोपार्जीत स्थीत मौजे कांडली (BK) , ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथील शेतजमीन सदरील अज्ञानांचा नावे असलेली मालमत्ता विक्री करण्याच्या परवानगीचा अर्ज त्यांचे वकील श्री. शेख अब्दुल कलाम यांचे मार्फत या न्यायालयात प्रकर दाखल केला आहे.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. करीता या बाबत कुणास उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी विहित कालावधीत किंवा दिनांक ०८/१२/२०२६ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता आपण स्वतः जातीने किंवा आपल्या वकिलामार्फत या न्यायालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीच्या आत कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा उजर न आल्यास सदरील प्रकरण हे कायदयान्वये निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक २८ माहे ऑक्टोबर सन २०२६ रोजी
माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

लिपीक,
दिवाणी विभाग
जिल्हा न्यायालय-१, भोकर

आदेशावरुन
अधिक्षक,
जिल्हा न्यायालय-१, भोकर

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

देव, देश आणि धर्म यांच्या उत्थानाकरता आणि संवर्धनासाठी आरोग्य महत्त्वाचे म्हणून योग अंगीकारावा -१०८ वेदांताचार्य दिगंबर स्वामी

नांदेड (प्रतिनिधी)– देव, धर्म, राष्ट्र धर्माच्या कौशल्याशिवाय सुगंध देऊ शकत नाही, म्हणून योगाचे कौशल्य सिताराम गुरुजी नित्य प्रदान करत आहेत. देव, देश व धर्म याच्या उत्थानाकरता आणि संवर्धनासाठी आरोग्य महत्त्वाचे म्हणून योग अंगीकारावा, असे प्रतिपादन १०८ दिगंबर स्वामी महाराज यांनी केले.

श्री विराट विश्वकर्मा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित नांदेड योग सेवा समिती महाराष्ट्रच्या वतीने रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी योगाचार्य नांदेड योग रत्नभूषण सिताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली योगिक महासंमेलनाचे आयोजन अनिल लॉन्स, निळा रोड येथे सकाळी ५ ते ८ या दरम्यान करण्यात आले. या महासंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी वेदांतचार्य दिगंबर स्वामी महाराज हे बोलत होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी योगाचार्य सिताराम गुरुजी यांनी दीड तास प्राणायाम योगासने अभ्यास घेतल्यानंतर १०८ वेदांतचार्य दिगंबर स्वामी महाराज यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तर विधानसभेचे आमदार बालाजीराव कल्याणकर, प्रमुख मार्गदर्शक योगाचार्य नांदेड योगरत्न भूषण सिताराम सोनटक्के गुरुजी तर कार्यक्रमाला नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, भारतमाता मंदिर संस्थापक तुळशीराम केरले गुरुजी, योगगुरू अरविंद जाधव वसमत, उद्योजक अनिल शेटकार, नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार, वरिष्ठ संपादक केशव घोणसे पाटील, शंतनू डोईफोडे, संतोष पांडागळे, गणेश जोशी, पत्रकार शरद काटकर, श्रीनिवास भोसले, प्रल्हाद आयनेले, चांदोजी पावडे मंगल कार्यालयाचे संचालक नारायण पावडे, आशियाई योग चॅम्पियन किशन भवर, सोपान काळे, योग शिक्षक विरभद्र स्वामी, शिवमंदिर पुजारी एकनाथ महाराज, रेवणसिद्ध स्वामी, माधव पावडे, बसवराज बिरादार, शिव प्रेमा दीदी ब्रह्मकुमारी आदींची उपस्थिती होती.

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सर्वांना जोडणारे योग गुरु अशी योगाचार्य सिताराम यांची प्रशंसा करत योग समानतेचा संदेश असून योग ही त्यागाची चळवळ आहे. नवीन पिढीने योग स्वीकारून एक चळवळ निर्माण करावी, असे प्रतिपादन केले.

यावेळी आमदार बालाजीराव कल्याणकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नांदेड योग सेवा समितीच्या वतीने सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत योग गुरु देविदासराव टेळकीकर यांना योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर नांदेड योग सेवा समिती अंतर्गत २०० आदर्श योग शिक्षक व साधक यांना आरोग्य रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सदरील महासंमेलनात आदर्श योग शिक्षिका सविता चव्हाण यांनी निरंतर दिड तास सूर्यनमस्कार अभ्यास केला तर हा कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंदात पार पडला कार्यक्रमानंतर सर्व योगप्रेमींना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सदरील महासंमेलनाला शेकडो योग शिक्षक व योग साधकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नांदेड योग सेवा समितीच्या सर्व पदाधिकारी, योगशिक्षक व योग साधकांनी परिश्रम घेतले.

परभणीत अवैध वाळू तस्करांवर उमापांच्या पथकाचा छापा; ८७.७५ लाखांची साधनसामग्री व वाळू जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– परभणी जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीविरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी मोठी कारवाई केली आहे.

जिंतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निलज शिवारात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळताच डीआयजी उमाप यांनी आपल्या विशेष पथकाला तत्काळ कारवाईसाठी पाठवले.

इंजिन बोटीने सुरू होता वाळू उपसा

सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी पथकाने निलज शिवारातील वाळू धक्क्यावर छापा टाकला असता तेथे इंजिन बोटीच्या साहाय्याने नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करून ती किनाऱ्यावर आणली जात असल्याचे निदर्शनास आले.

या कारवाईत पथकाने ३ टिप्पर, १ जेसीबी, १ ट्रॅक्टर, १ चाळणी मशीन आणि नदीपात्रातून काढून ठेवलेली १० ब्रास वाळू असा एकूण ८७ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



ही यशस्वी कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्या नेतृत्वात पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे आणि गजानन डवरे यांनी पार पाडली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचावी यासाठी DIG कार्यालयाने 'खबर' हेल्पलाइन (मो. क्र. ९१ ५० १०० १००) सुरू केली आहे. आपल्या भागातील अवैध धंद्यांची माहिती या क्रमांकावर देऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन शहाजी उमाप यांनी केले आहे.



नांदेड – माजी मंत्री कमलकिशोर कदम यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रऊफ जमीनदार यांच्या वतीने अभीष्टचिंतन करण्यात आले. यावेळी निखिल नाईक, लखनसिंघ लांगरी, खदिर कुरेशी, शे. सरदार, शे. अतिक बिल्डर, सदाम, वसीम, सत्तार, शेख युसूफ, साहिल खान, खाजा भाई, निखिल कांबळे, उदय गोरे, हफिज तौफिख आदी उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

आरोग्य यंत्रणेतील रिक्त पदे तातडीने भरा

आ. श्रीजया चव्हाण यांची आरोग्यमंत्र्यांकडे मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेतील सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांच्याकडे केली.

आरोग्यमंत्र्यांनी राज्यव्यापी आरोग्य संवाद यात्रा सुरू केली असून, नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान त्यांनी आज लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेतली. या बैठकीत सहभागी होऊन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि आ. श्रीजया चव्हाण यांनी आरोग्य विभागाशी संबंधित विविध प्रश्नांकडे आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

या वेळी आ. श्रीजया चव्हाण यांनी भोकर विधानसभा मतदारसंघातील भोकर, मुदखेड व अर्धापूर या तालुक्यांमधील आरोग्यविषयक समस्या मांडल्या. त्या म्हणाल्या की, सध्या सोनोग्राफी मशीनचा वापर प्रामुख्याने गरोदर महिलांसाठीच मर्यादित राहिला आहे. मात्र इतरही अनेक आजारांच्या अचूक निदानासाठी ही चाचणी आवश्यक असल्याने इतर गरजू रुग्णांनाही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. याशिवाय डायलिसिस केंद्रासाठी नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करणे, रुग्णालयांच्या नियमित साफसफाईसाठी कंत्राटदार नियुक्त करणे, जैव-वैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी दाहक यंत्र (इन्सिनरेटर) उपलब्ध करून देणे आणि येळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली.

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनीही या बैठकीत महत्त्वाचे विषय उपस्थित केले. ते म्हणाले की, विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला 'सुपर स्पेशालिटी'चा दर्जा देण्याचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे; त्यासाठी राज्य शासनाने ठोस पाठपुरावा करावा. यासोबतच भोकर येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक निधी देऊन प्रलंबित काम लवकरात लवकर पूर्ण करणे, भोकर येथील शासकीय नर्सिंग कॉलेजच्या प्रस्तावाला मंजुरी देणे आणि सर्वच रुग्णालये व आरोग्य केंद्रांत पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देणे आदी मागण्या त्यांनी याप्रसंगी केल्या.



मनपात पदोन्नतीचा 'अर्थ'पूर्ण खेळ उघड

कनिष्ठपदाचे काम, वेतन मात्र वरिष्ठ श्रेणीचे-आयुक्तांकडे चौकशीची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत नियमांना हरताळ फासून बेकायदेशीर पदोन्नती देण्यात आल्याचा आणि महापालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. भाजप नगरसेवक साहेबराव गायकवाड यांनी याबाबत महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

महापालिकेचे अधिकारी गुलाम सादेक समदानी हे सध्या मालमत्ता विभागाचे कोणतेही काम करत नसून, ते केवळ सहायक आयुक्त (एस-१५) या कनिष्ठ पदाचे काम पाहत आहेत. असे असतानाही त्यांना उपमालमत्ता विनियोग व व्यवस्थापन अधिकारी (एस-२०) या वरिष्ठ वेतनश्रेणीचे वेतन दिले जात आहे. म्हणजेच प्रत्यक्ष काम कनिष्ठ पदाचे आणि वेतन वरिष्ठ श्रेणीचे, असा अजब कारभार सुरू आहे. सध्या मालमत्ता विभागाचा कार्यभार स्वतंत्र उपायुक्तांकडे आहे, जे पद एस-२० च्या समकक्ष आहे. त्यामुळे गुलाम सादेक यांना वरिष्ठ पदाचे वेतन देणे हा सरळसरळ प्रशासकीय गैरव्यवहार असल्याचा आरोप गायकवाड यांनी केला आहे.

गुलाम सादेक यांची २०१४ मध्ये मालमत्ता व्यवस्थापक (एस-१४) पदावर पदोन्नती झाली होती. नगरविकास विभागाच्या १४ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार या पदाचे नाव 'मालमत्ता विनियोग व्यवस्थापक' (एस-१५) असे बदलून त्यासाठी ३ वर्षांच्या प्रत्यक्ष अनुभवाची अट घालण्यात आली. महापालिकेने ऑगस्ट २०२४ मध्ये हे नियम लागू केले.

प्रत्यक्षात समदानी हे २०१६-१७ पासून (२०२१-२२ वगळता) आस्थापना, सामान्य प्रशासन व घनकचरा व्यवस्थापन विभागात प्रभारी सहायक आयुक्त म्हणूनच कार्यरत आहेत. असे असतानाही मालमत्ता विनियोग व्यवस्थापक पदास मान्यता मिळाल्याच्या अवघ्या ४ महिन्यांतच, ३ वर्षांचा अनुभव असल्याचे दाखवून २६ डिसेंबर २०२४ रोजी त्यांना थेट उप मालमत्ता विनियोग व व्यवस्थापन अधिकारी (एस-२०) या उच्च पदावर पदोन्नती देण्यात आल्याचा आरोप आहे. एस-२० श्रेणीतून अदा करण्यात आलेल्या वेतनातून एस-१४/एस-१५ चे मूळ वेतन वजा करून उर्वरित अतिरिक्त रकमेची त्यांच्या पगारातून तत्काळ वसुली करावी, अशी मागणी गायकवाड यांनी केली आहे. ही वसुली अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (प्रशासन), मुख्य लेखाधिकारी आणि मुख्य लेखापरीक्षक यांनी निश्चित करावी, अन्यथा संगनमताने आर्थिक नुकसान करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

वाडी बुद्रुकच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे आ. कल्याणकर यांनी मानले आभार

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील जनतेने सलग दोन वेळा आमदार म्हणून निवडून देत माझ्यावर विश्वास दाखविला. एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलाला विधानसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी दिल्यामुळे मी या मायबाप जनतेचा कायम ऋणी आहे. या विश्वासाचे ऋण विकासकामांच्या माध्यमातून फेडण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे, अशी भावना आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी व्यक्त केली.

वाडी बुद्रुक येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्यानंतर त्यांनी या रुग्णालयाच्या उभारणीसाठी सहकार्य करणाऱ्या शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे जाहीर आभार मानले.

वाडी बुद्रुक येथे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करून घेण्यासाठी आमदार कल्याणकर यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सुरुवातीला काहीजणांनी या ठिकाणी रुग्णालय मंजूर होणार नसल्याची भूमिका घेतली होती. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी रुग्णालय मंजुरीचा प्रश्न मार्गी लावला. त्यानंतर इमारतीच्या बांधकामातही काही अडथळे निर्माण झाले. मात्र, या अडचणींवर मात करून त्यांनी रुग्णालयाची इमारत पूर्णत्वास नेली. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त शासकीय रुग्णालय उपलब्ध झाले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते या रुग्णालयाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आमदार कल्याणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच आरोग्यमंत्र्यांचे विशेष आभार मानले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील जनतेने एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाला सलग दोन वेळा आमदार म्हणून निवडून दिले. या जनतेला मोफत शासकीय रुग्णालयात आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने वाडी बुद्रुक येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. या प्रयत्नांना यश मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले. आरोग्यमंत्र्यांनीही मोलाची भूमिका बजावली.

हा प्रकल्प साकारण्यासाठी पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले. नांदेडमधील महायुतीतील सहकारी पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले. याशिवाय जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड महानगरपालिका तसेच संबंधित विभागांतील अधिकारी, पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून सहकार्य केले. रुग्णालयाच्या उभारणीसाठी वाडी बुद्रुक येथील आजी माजी सरपंच, आजी माजी उपसरपंच, ग्रामपंचायतचे आजी-माजी सदस्य आणि ग्रामस्थांचेही मोलाचे सहकार्य मिळाले असल्याचे आ. कल्याणकर यांनी सर्वांचे आभार मानले.

गोदावरी अर्बनची यशस्वी वाटचाल; संस्थेच्या कार्यपद्धतीचे मंत्री आबिटकर यांनी केले कौतुक

नांदेड (प्रतिनिधी)– प्रशिक्षित कर्मचारी, प्रभावी व्यवस्थापन आणि जनतेने दाखविलेला विश्वास यांची उत्कृष्ट सांगड घालत गोदावरी अर्बनने सहकार क्षेत्रात निर्माण केलेली ओळख आणि सुरू असलेला प्रगतीचा प्रवास निश्चितच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काढले.

मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गोदावरी अर्बनच्या सहकारसूर्य येथील मुख्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेचे संस्थापक आमदार हेमंत पाटील, आमदार आनंदराव बोंढारकर, अध्यक्षा राजश्री हेमंत पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान मंत्री आबिटकर यांनी संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली. सहकार क्षेत्रात विश्वासार्हता जपत आधुनिक व्यवस्थापन, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि ग्राहकाभिमुख सेवा



यांच्या माध्यमातून गोदावरी अर्बनने केलेली प्रगती उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या यशस्वी वाटचालीत कर्मचारी आणि ग्राहक यांच्यातील विश्वासाचे नाते महत्त्वपूर्ण असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी गोदावरी अर्बनचे सहाय्यक सरव्यवस्थापक विजय शिरमेवार, विपणन अधिकारी महेश केंद्रे, आयटी मॅनेजर पवन यादव, डेप्युटी मॅनेजर प्रशांत कदम यांच्यासह कर्मचारीवृंद उपस्थित होता.

विनय पाटील गिरडे यांचा वाढदिवस साजरा; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या शुभेच्छा

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– शिवसेनेचे दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, शिवसेनेचे प्रतोद आ. हेमंत पाटील, आ. आनंदराव पाटील बोंढारकर व शिवसेनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच स्कूल बस संघटना, नांदेड ब्लड सेंटर यांच्या वतीने रक्तदान शिबीर, अन्नदान वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिवसेनेचे दक्षिण जिल्हा प्रमुख, माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे यांच्या २ नोव्हेंबर रोजी आयोजित वाढदिवसाच्या निमित्ताने सिडको परिसरातील वात्सल्य नगर सोसायटीमध्ये अभीष्टचिंतन सोहळा आयोजित



करण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा संदेश पाठवला तर आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, शिवसेनेचे प्रतोद आमदार हेमंत पाटील, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यासह लातूर जिल्हा प्रमुख चंद्रकांत पाटील, नांदेड उत्तर जिल्हा प्रमुख गंगाधर बडुरे, डॉक्टर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय कदम, नगरसेवक डिंपलसिंह नबाब, राजे सिंग महाजन, प्रतिनिधी अमोल गोडबोले, युवा शिवसेना जिल्हाप्रमुख विठ्ठल पाटील मोरे, युवा सेना जिल्हा प्रमुख बाळू पाटील मोरे, सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, अमोल येरेगवार, विनायक आकुरगे, युवा सेना शहरप्रमुख गौरव दरबस्तवार, भोकर तालुका प्रमुख माधव वडगावकर, रावसाहेब गिरडे, शिवाजी गिरडे, गंगाधर गिरडे, ॲड. संदीप गायकवाड, अंकुश शिखरे, जगदीश भुरे, सिडको उपशहरप्रमुख वैजनाथ माने, पप्पु गायकवाड, राजू टमान्ना, सचिन गिरडे, उत्तम गिरडे, दीपक गिरडे, साईनाथ गिरडे, रवि थोरात, गोविंद गिरडे, आनंद गिरडे, विकास पवार, नितीन जोंधळे, किशन कदम, मयुर सुत्रावे, मुन्ना कोलंबीकर, श्रीकांत पतलावे, गजानन गिरडे, बजरंग गिरडे, चंद्रकांत हंबर्डे, सुदाम पाटील, राहुल गवारे, रूपेश ढवळे, सतिश ठाकूर, संजय श्रीरामे, हणमंत कदम, कपिल नरवाडे, रवि रायभोळे, यश धूत, शाहीर गौतम पवार, माजी सरपंच अमोल गोडबोले, माजी उपसरपंच सुदिन बागल, नागेश वाघमारे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com